दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची
बुधवार, दि. २९ जुलै २०२६
www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २१४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# शेतकऱ्यांना कर्ज नील सर्टीफीकेट मिळणार

## दोन लाखांपर्यंत सरसकट कर्जमाफ होणार, मंत्री दत्रात्रय भरणेंची माहिती

**मुंबई (दै. संध्या)**



राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे 56 लाख शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमुक्त करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. संपूर्ण योजनेसाठी एकूण 36 हजार 585 कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे. राज्य सरकारने नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात या योजनेसाठी 20 हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. दरम्यान, कर्जमुक्ती योजनेच्या दोन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. दरम्यान, काही ठिकाणी शेतकरी कर्जमाफीच्या यादीमध्ये गोंधळ झाल्याचं चित्र सध्या दिसून येत आहे. अशातच राज्याचे कृषीमंत्री दत्रात्रय भरणे यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे. लवकरच शेतकऱ्यांना त्यांचे कर्ज नील झाल्याचे सर्टीफीकेट मिळणार असल्याची माहिती भरणे यांनी दिली आहे. कृषीमंत्री दत्रात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच शेतकऱ्यांना त्यांचे कर्ज नील झाल्याचे सर्टीफीकेट मिळणार आहे. दोन लाखांपर्यंचे सरसकट कर्ज माफ होणार आहे. आमदार खासदार मंत्री यांच्या हस्ते शेतकऱ्यांना सर्टीफीकेट दिले जाणार असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

शेतकरी कर्जमाफीच्या यादीमध्ये गोंधळ असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे, दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची सरकारची घोषणा आहे, मात्र प्रत्यक्षात कर्जमाफीच्या यादीत दोन लाखांपर्यंत कर्ज माफ होत नसल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. धाराशिवच्या गंधोरा गावात कर्जमाफीच्या यादीत 233 शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे, मात्र यादीतील 80% शेतकऱ्यांच्या कर्जमाफीत गोंधळ असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आल्यानंतर आपलं पासबुकही पुरावा म्हणून माध्यमांसमोर दाखवलं

## २ लाखांच्या आत कर्ज असेल तर पैसे भरू नका



दरम्यान, 2 लाखाच्या आत कर्ज असेल तर पैसे भरायची गरज नाही. बँकेला कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांना त्रास देता येणार नाही. जर कर्ज रक्कम कुणाला नाकारण्यात आली असेल तर कागदपत्रे कुठेतरी कमी असतील, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटले. तसेच, लवकरच शेतकरी कर्जमुक्तीची पुढची यादी येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. 2 लाख रुपयांच्या वर कर्ज असेल तर ते भरण्यासाठी देखील वेळ दिलेला आहे. आता 2 याद्या जाहीर झालेल्या आहेत, इतर देखील याद्या लवकरच जाहीर होतील. कोणीही टोकाचं पाऊल उचलू नये, असे आवाहन दत्तात्रय भरणे यांनी केलंय.

# प्रधानांना हटवून पंतप्रधानांना वाचवलं, दान चोरी रोखू न शकणारे पेपर लीक कसे रोखणार?

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



लोकसभेत पेपरफुटी विरोधात एक विधेयक केंद्र सरकारकडून सादर करण्यात आलं आहे. या विधेयकावर बोलताना समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. धर्मेंद्र प्रधानांना हटवून पंतप्रधानांना वाचवण्यात आलं, अशी टीका यादव यांनी केली. जे लोक राम मंदिरातील दान चोरी रोखू शकली नाही ती पेपर फुटी कशी रोखणार असा सवाल देखील अखिलेश यादव यांनी केला आहे. अखिलेश यादव म्हणाले की आंदोलन दूरवरुन पाहत होतो. आंदोलनात विजयानंतर सरकार विरोधात घोषणा सुरु होत्या. सरकारला अहंकार होता की सरकार झुकत नाही. नव्या पिढीनं घोषणा दिली की सरकार पण झुकते, झुकवणारे पाहिजेत. प्रधानांचा राजीनामा घेऊन पंतप्रधानांना वाचवण्यात आलं. सरकार अनेक वर्षांपासून नकारात्मक राजकारण करत होतं. नकारात्मक प्रचारासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्यात आले.मात्र, या देशातील युवकांनी सरकारला झुकवलं, असं अखिलेश यादव म्हणाले. अखिलेश यादव म्हणाले 20 लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती असं मानलं आणि प्रत्येक कुटुंबात पाच लोक असतात त्याप्रमाणं 1 कोटी लोक होतात. विद्यार्थ्यांचं आंदोलन असं होतं ज्यात पहिल्यांदा आई वडिलांनी मुलांना सांगितलं की जाऊन आंदोलन करा. हे जर चुकीचं असेल तर गृहमंत्र्यांना बोलवा, ते सगळं स्पष्ट करतात. जे लोक राम मंदिरातील दान वाचवू शकले नाहीत ते पेपरफुटी कशी रोखणार असा सवाल अखिलेश यादव यांनी केला. देवाच्या दरबारातून दान गायब झालं. लोकांच्या डोळ्यात धूळफेक सुरु आहे, अशी टीका अखिलेश यादव यांनी केली.

# राज्यात २९ ते ३१ जुलैदरम्यान विविध भागांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज

**मुंबई (दै. संध्या)**



बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेशमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याचाही अंदाज आहे. तुलनेने मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे. या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडू शकतात. त्यामुळे सखल भागांत पाणी साचणे, नदी-नाल्यांना पूर येणे, काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होणे, वाहतुकीवर परिणाम होणे तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी दरड कोसळण्याचाही धोका आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार, २९ जुलै रोजी कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव प्रामुख्याने विदर्भात, विशेषतः पूर्व विदर्भात जाणवण्याची शक्यता आहे. ३० जुलै रोजी त्याचा प्रभाव पश्चिम विदर्भ, खानदेश, उत्तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकणात अधिक जाणवू शकतो. ३१ जुलै रोजी खानदेशातील काही भाग तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात ३० आणि ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत ३० जुलै रोजी पावसाची तीव्रता अधिक राहण्याचा अंदाज आहे. विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहावे. विशेषतः सखल भाग, नदी-नाल्यांच्या परिसरात तसेच घाट रस्त्यांवरून प्रवास करताना अधिक काळजी घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत दिल्लीत मोठी घडामोड

## मोदी-पवारांच्या भेटीच्या दुसऱ्याच दिवशी चक्रं फिरली

**मुंबई (दै. संध्या)**



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सातत्याने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची जोरदार चर्चा सुरु आहे. मध्यंतरी विलिनीकरणाची मोहीम बारगळल्याचे वाटत होते. मात्र, गेल्या काही दिवसांमध्ये दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या प्रक्रियेने पुन्हा वेग धरला आहे. यासंदर्भात दिल्लीत एक महत्त्वाची घडामोड घडल्याची माहिती समोर आली आहे. पार्थ पवार आणि प्रफुल पटेल यांनी शरद पवारांची दिल्लीत भेट घेतल्याचे समजते. या भेटीमुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची प्रक्रिया पुन्हा सुरु होण्याची शक्यता आहे.

दिल्लीत जंतर मंतरवर कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु असताना बुधवारी शरद पवार यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या दोन्ही नेत्यांमध्ये बराचवेळ चर्चाही झाली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पार्थ पवार आणि प्रफुल पटेल हे दोघे शरद पवारांना भेटायला गेल्याने मोदींच्या भेटीनंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चक्रं फिरल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून संसदेत येऊ घातलेल्या लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएसोबत जाण्याची चर्चा सातत्याने सुरु आहे. भाजप श्रेष्ठींनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीला अजित पवारांच्या राष्ट्रवादीत विलीन होऊनच एनडीएमध्ये येण्याची अट घातल्याचीही माहिती समोर आली होती. मात्र, सुनेत्रा पवारांचा विलिनीकरणाला विरोध असल्याचीही चर्चा होती. या पार्श्वभूमीवर पार्थ पवार व प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची घेतलेली भेट महत्त्वाची मानली जात आहे. याशिवाय, अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भात तटकरे यांनी बोलण्यास नकार दिला. मात्र, गेल्या काही दिवसांतील या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे बोलले जात आहे. रेवती सुळे आणि सारंग लखानी यांच्या लग्नानंतर 10 ऑगस्टला दिल्लीत रिसेप्शन पार पडणार आहे. सुप्रिया सुळे या सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी सोमवारी अमित शाह यांना भेटल्या होत्या. सूत्रांच्या माहितीनुसार, या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सोनिया गांधी, राहुल गांधीसह अनेक राजकीय नेते उपस्थित राहणार आहेत.

### मी एनडीएसोबत जाणार नाही : रोहित पवार

रोहित पवार यांनी शरद पवार हे एनडीएसोबत जाणार असल्याच्या वृत्ताचा इन्कार केला. विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शरद पवार मोदींना भेटले. युवा वर्गावर होणारा अन्याय त्यांनी मांडला आहे. सुप्रिया सुळे या अमित शाह यांना भेटल्या. 10 ऑगस्टला दिल्लीत रेवती सुळे-सारंग लखानी यांच्या लग्नाचे रिसेप्शन होणार आहे. त्या कार्यक्रमाला खासदार केंद्रीय मंत्री देखील येणार आहेत. शरद पवार एनडीएसोबत जाणार नाहीत. आमच्याकडचे बहुतांश आमदार-खासदार लढाईला तयार आहेत. मी लोकांसोबत, विचारासोबत राहिलो आहे. त्यामुळे पुढे जाऊन देखील मी लढणार आहे. एनडीए सोबत मी जाणार नाही, असे रोहित पवार यांनी ठणकावून सांगितले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## पुणे, अहिल्यानगरपासून सोलापूर परभणी, नांदेडपर्यंत...

# मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारचे धडाकेबाज निर्णय



**मुंबई (दै. संध्या)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली (28 जुलै) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहे.

**आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतलेले 8 महत्वाचे निर्णय :**

- महाॲग्री-एआय धोरणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र कार्यालयातील "व्यवस्थापकीय संचालक" पदास मान्यता. (कृषी विभाग)
- मादक द्रव्ये व मादक पदार्थ अधिनियम 1985 (NDPS Act) अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरीता पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास मान्यता. (विधि व न्याय)
- कर्जत, जि. अहिल्यानगर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक पदे मंजूर करण्यास मान्यता. (विधि व न्याय)
- कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक पदे मंजूर करण्यास मान्यता.(विधि व न्याय)
- अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989, सुधारीत अधिनियम, 2015 अनुसार दाखल प्रकरणांच्या सुनावणीसाठी अहिल्यानगर, परभणी, सोलापूर, नांदेड व यवतमाळ येथे अनन्य विशेष न्यायालये (Exclusive Special Courts) स्थापन करण्यास मान्यता. (विधि व न्याय))
- ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यासंदर्भात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1959 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, 1961 मध्ये सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. (ग्राम विकास व पंचायती राज)
- मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित कंपनीच्या अधिकृत समभाग भांडवलामध्ये 25 कोटी रुपयांवरून 500 कोटी रुपयापर्यंत वाढविणार. कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलातही 25 कोटी वरुन 225 कोटी रुपये वाढवणार. (नगर विकास विभाग)
- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48 (7) सुधारणा. गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीसाठी स्वामित्वधनाच्या दहापट दंड. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)

# पुरंदर तालुक्यात पहिल्या टप्प्यात ३ हजार ९२५ शेतकऱ्यांना दिलासा

## २८ कोटी ६६ लाख २३३५० रुपयांची कर्जमाफी मंजूर

## पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेची कार्यवाही

- पुरंदर तालुक्यातील पहिल्या टप्प्यात 03 हजार 925 शेतकऱ्यांना मोठा दिलासा, 28कोटी 66 लाख23350 रुपयांची कर्जमाफी मंजूर 91 गावांतील लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध
- कर्जमाफीसाठी आधार प्रमाणीकरण अनिवार्य
- आतापर्यंत 2900 शेतकऱ्यांनी प्रक्रिया पूर्ण
- उर्वरित पात्र शेतकऱ्यांची यादी लवकरच जाहीर होणार



**सासवड (दै. संध्या)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पुरंदर तालुक्यातील 94 विविध कार्यकारी सहकारी सोसायटीतील पात्र शेतकऱ्यांना योजनेच्या पहिल्या टप्प्यात 03 हजार 925 शेतकऱ्यांना 28 कोटी 66 लाख 23350 रुपये कर्जमाफीस मंजुरी मिळाली आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यक्षेत्रातील 91 गावांतील लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. संबंधित लाभार्थींनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून कर्जमाफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व माजी आमदार संजय जगताप व विभागीय अधिकारी महेश खैरे यांनी दिली .

खैरे यांनी सांगितले की, योजनेअंतर्गत पुरंदर विभागातील 06 हजार 534 थकीत शेतकऱ्यांच्या 07हजार 903 नोंदी शासनाच्या महाआयटी संकेतस्थळावर अपलोड करण्यात आल्या आहेत. प्रसिद्ध झालेल्या याद्या जिल्हा बँकेच्या सर्व शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायती व तलाठी कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार कार्ड अथवा यादीतील विशिष्ट क्रमांकाच्या आधारे 'आपले सरकार सेवा केंद्रात' आधार प्रमाणीकरण पूर्ण केल्यानंतरच कर्जमाफीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. आतापर्यंत 2900 शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली असून, उर्वरित लाभार्थींनीही विलंब न करता प्रमाणीकरण करावे.योजनेतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांची पुढील यादी लवकरच जाहीर करण्यात येणार असून, त्यांनाही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन बँकेने केले आहे.

> "राज्य शासनाने दिलेल्या कर्जमाफीच्या लाभातून कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये. लाभार्थी शेतकऱ्यांनी विलंब न करता आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, जेणेकरून कर्जमाफीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होईल."
> **- संजय चंदूकाका जगताप संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक**

## संपादकीय

# 'शालार्थ'चा अनर्थ

नीट पेपरफुटीवरून पेटलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची धग राजधानी दिल्लीसह देशातील अनेक राज्ये आणि प्रमुख शहरांत जाणवली. अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. साधारण याच काळातील राज्यातील टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा)ची पेपरफुटी तुलनेत किरकोळ ठरली. पाठोपाठ बहुचर्चित शालार्थ आयडी घोटाळ्याशी संबंधित ठळक घडामोडींकडेही अनेकांचे लक्ष गेले नसावे. या गैरव्यवहाराची व्याप्ती सुमारे दोनशे कोटी रुपये असल्याची आकडेमोड केली जात होती; प्रत्यक्षात ती किती तरी अधिक पट असल्याचे समोर येते आहे. विशेष चौकशी पथकांना (एसआयटी) तसे पुरावेच मिळाले आहेत. शासकीय तिजोरी आणि शेकडो उमेदवारांची लूट करणाऱ्या या फसवणुकीचे धागेदोरे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचत असल्याने सरकारला अधिक दिवस नामानिराळे राहता येणार नाही. जळगाव जिल्हा परिषदेचे तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांना नाशिकच्या 'एसआयटी'ने गेल्या आठवड्यात धुळ्यातून अटक केली. त्यांच्याकडून 'शालार्थ'शी संबंधित बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला. या महाशयांनी सेवानिवृत्तीनंतरसुद्धा तब्बल २५९ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 'बॅक डेटेड' वैयक्तिक मान्यता देण्याचे कारनामे करून दाखविले. हिंगोणेकर हे राज्य सरकारच्या 'कवी केशवसुत पुरस्कारा'चे मानकरी कविवर्य आहेत. आता थेट कारागृहात रवानगी झाल्याने आपली काव्यलेखनाची हौस ते तेथे निवांत भागवू शकतील! सन २०११ ते २०१५ या काळात त्यांनी बोगसगिरीचा कळस गाठला, ज्यामुळे शिक्षण खात्यातील अनेक मुखंड, मंत्री आणि खुद्द सरकारच्या अडचणीही वाढणार आहेत. हिंगोणेकर यांच्या अटकेआधी आर्थिक गुन्हे शाखेने धुळ्यातील संस्थाचालक प्रशांत वाडिले याला ताब्यात घेतले. या महाभागाची कारकीर्दही डोळे विस्फारवणारी. त्याने अल्पावधीत तब्बल ६७ शैक्षणिक संस्था उभारल्या. मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांसह इतरांच्या नावे विनास्वाक्षरीची पत्रे त्याच्याकडे आढळली, जी स्पष्टपणे मंत्रालयाच्या सहभागाकडे अंगुलिनिर्देश करीत आहेत. वाडिलेने प्रत्येक उमेदवाराकडून बनावट आयडीसाठी वीस ते पंचवीस लाख उकळले. राज्यभरात बाराशेहून अधिक शिक्षक व कर्मचाऱ्यांचा अशा गैरकृत्यांत सहभाग आहेच. त्यामुळे या घोटाळ्याची व्याप्ती हमखास काही हजार कोटी असणार. बनावट शालार्थ आयडीची चौकशी करणाऱ्या समितीला राज्याने तीन महिन्यांची मुदतवाढ दिल्याने कदाचित सरकारची अब्रू आणखी काही दिवस वाचेलही. परंतु, येत्या काळात उत्तर तर नक्कीच द्यावे लागेल. बनावट शालार्थ आयडीचे जाळे इतकी वर्षे राज्यभर फोफावले. सरकारी नोकरीसाठी वाटेल त्या स्तराला जाण्याच्या हव्यासापोटी असंख्य उमेदवार आणि अनेक ख्यातकीर्त संस्था भरडल्या गेल्या.

कळत-नकळत त्या या गैरकारभारात सहभागी झाल्या. उत्तर महाराष्ट्रातील ८४१ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे 'आयडी' बनावट आढळले. पैकी तब्बल ६३८ प्रकरणे एकट्या जळगावमधील. बाराशेहून अधिक संशयितांपैकी जेमतेम डझनभर संशयितांना अटक झाली, ज्यात मुख्यत्वे शिक्षण विभागातील अधिकारी व दलालांचाच समावेश. अटक वाचविण्यासाठी तीसेक लोकांची धावाधाव सुरू असल्याने तेथे अर्थपूर्ण घडामोडी घडत आहेतच. खुद्द शिक्षणमंत्र्यांच्या विभागात सर्वाधिक बोगसगिरी असेल तर इतर खिजगणतीतही नाही. शिक्षण विभागात बदल्या, प्रस्ताव, वैद्यकीय रजा, शिक्षक भरती अशा सर्वच पातळ्यांवर बिनबोभाट लाचखोरी सुरू असते. काही समोर आल्यास चौकशी होते, पण नाममात्रच! नीट पेपरफुटीबद्दल उशिराने का होईना, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला.

महाराष्ट्रातही घोटाळ्यांबद्दल कोणा मंत्र्यावर दायित्व निश्चित होईल तो सुदिन. कदाचित 'जेन झी'सारख्या घटकांच्या आंदोलनाची शिक्षण विभागाला प्रतीक्षा असावी. शिक्षणाला राष्ट्राच्या भवितव्याचा पाया मानले जाते. हा पायाच अनैतिकता, भ्रष्टाचाराने पोखरला गेला असेल तर कोणत्या उज्ज्वल भविष्याची अपेक्षा करणार?

## गुरु वचन

### इच्छाशक्तीच्या बळावर जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव.

आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे-बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता.

आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.

यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले. यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.

तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक 'द स्टोरी ऑफ लाईफ' प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.

इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच नसती. म्हणूनच केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच आपण विजय मिळवू शकतो हे विसरता कामा नये.

## उपदेशकथा

### वक्ता नरेंद्र

स्वामी विवेकानंदांचे लहानपणीचे नाव होते नरेंद्र. या नरेंद्राच्या शाळेतील एक शिक्षक निवृत्त होणार होते. विद्यार्थ्यांचे ते लाडके शिक्षक असल्याने त्यांनीच आपल्या गुरुजींसाठी एक निरोप समारंभ आयोजिला होता. समारंभाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांना आमंत्रण होते. ते बंगालमधील एक ख्यातनाम विद्वान आणि देशभक्त होते. आयसीएसची परीक्षा उत्तीर्ण होऊनही इंग्रजांची चाकरी करायची नाही असे ठरवून ते शाळेचे मुख्याध्यापक झाले होते. तसेच ते पट्टीचे वक्ते हेते. अशा व्यक्तीसमोर आपल्यापैकी कोणी भाषण करायचे असा प्रश्न समारंभ आयोजित करणाऱ्या मुलांना पडला. शेवटी नरेंद्रावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. अन् नरेंद्राने खरोखरच फार सुंदर भाषण करून सर्वांची मने जिंकली. भावमधुर शब्द आणि ओघवात वक्तृत्व यामुळे त्यांचे बोलणे ऐकताना सर्वजण भारावून गेले. स्वत: ईश्वरचंद्रांनी त्याची पाठ थोपटली आणि आपल्या भाषणात त्याचे कौतुक केले ! हाच नरेंद्र जेव्हा पुढे स्वामी विवेकानंद झाला, तेव्हाही आपल्या अमोघ वक्तृत्वाने त्यांनी जग जिंकले. शिकागोतील सर्व धर्म परिषदेप्रमाणे अमेरिका, युरोप आणि भारतातील सर्व व्याख्याने गाजली.

कथा उपदेश : शाळेय जीवनात व वक्तृत्वाला सुरवात केल्यास भावी काळात हमखास यश प्राप्त होते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6 | | 3 | 8 | 9 | |
| 3 | 1 | 4 | 9 | | | 7 | 5 | 6 |
| | 6 | | | | 7 | | | |
| | | 3 | 8 | | | | | |
| 2 | | 1 | | 4 | | 9 | | 7 |
| | | | | | 6 | 3 | | |
| | | | 7 | | | | 1 | |
| 4 | 7 | 6 | | | 9 | 5 | 2 | 3 |
| | 2 | 8 | 5 | | 4 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०२३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 2 | 5 | 7 | 1 | 6 | 9 | 3 |
| 5 | 3 | 1 | 6 | 8 | 9 | 7 | 4 | 2 |
| 6 | 9 | 7 | 3 | 2 | 4 | 1 | 5 | 8 |
| 3 | 5 | 9 | 1 | 6 | 7 | 2 | 8 | 4 |
| 1 | 7 | 8 | 4 | 3 | 2 | 5 | 6 | 9 |
| 2 | 6 | 4 | 8 | 9 | 5 | 3 | 1 | 7 |
| 7 | 2 | 6 | 9 | 5 | 8 | 4 | 3 | 1 |
| 9 | 4 | 3 | 2 | 1 | 6 | 8 | 7 | 5 |
| 8 | 1 | 5 | 7 | 4 | 3 | 9 | 2 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२१ – अडॉल्फ हिटलर नॅशनल सोशियालिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचा नेता बनला.
- १९५७ – इंटरनॅशनल ॲटोमीक एनर्जी एजेंसी (आयएईए) ची स्थापना झाली.
- १९८१ – प्रिन्स चॉर्लेस आणि लॅडी डायना स्पेन्सर यांचे लग्न झाले.
- २००६ – पूर्व चीनमधील चांगसू प्रातांतील जर्मनीच्या मदतीने उभारलेल्या एका कारखान्यात झालेल्या स्फोटत २२ जण ठार झाले तर २८ जखमी झाले.
- २००७ – रशियाची राजधानी मास्कोतून एका मालवाहू विमान आकाशात झेपावल्यानंतर काही वेळातच दुर्घटनाग्रस्त झाल्याने चालक दलाच्या ५ सदस्यांसमवेत ८ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९८७ – भारताचे पंतप्रधान राजीव गांधी आणि श्रीलंकाचे राष्ट्रपती जे.आर. जयवर्धने यांनी भारत–श्रीलंका मानववंश भूगोल मुद्याच्या करारावर स्वाक्षरी केली.
- २००६ – मुंबई महानगरपालिकेने दक्षिण मुंबईच्या क्राफर्ड मार्केट भागातील मुनिम कंपाउंडमधील कुख्यात डॉन दाऊद इब्राहिमच्या कथित मालकीच्या सारा सहारा संकुला जवळील सात अवैध इमारती जमीनदोस्त केल्या.


### जन्म

- १८८३ – बेनीटो मसुलिनी, इटलीचा आदेशक.
- १९०४ – जी.आर.डी. टाटा, भारतीय उद्योगपती.
- १९५९ – संजय दत्त, बॉलीवूड अभिनेता.

### निधन

- १०९९ – पॉप अर्बन दुसरा.
- १६४४ – पॉप अर्बन पाचवा.
- १९०० – अंबरटो पहिला, इटलीचा राजा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२४



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर–वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म–मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. व्रिासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

### जम्बो शब्दकोडे क्र. १०२३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर : १.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५.मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

## : SMS :

Mummy: Beta padhai karo, warna fail ho jaoge
Baccha: Mummy tension mat lo, pass hone ke liye bhi mehnat karni padti hai

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.१ | २४.८ |
| अहमदनगर | ३० | २२.९ |
| अकोला | ३४.२ | २६ |
| अमरावती | ३५ | २६ |
| बीड | ३९.५ | २६.५ |
| भंडारा | ३६.५ | २६.३ |
| बुलढाणा | ४५.६ | ३२.५ |
| चंद्रपूर | ३८.६ | २६.९ |
| चेन्नई | ४१.२ | ३०.८ |
| नवी दिल्ली | ४६.१ | ३३.७ |
| धुळे | ३३.३ | २५.६ |
| गोंदिया | ३४.९ | २६.१ |
| जळगाव | ३३.७ | २५.८ |
| कोल्हापूर | २९ | २२.२ |
| लातूर | ३४ | २३.८ |
| मुंबई | ३४ | ३१.८ |
| नागपूर | ३७.२ | २५.७ |
| नांदेड | ३५.१ | २५.७ |
| नंदूरबार | ३२.९ | २५.६ |
| नाशिक | २६.७ | २३ |
| पुणे | २६.१ | २२.६ |
| पंढरपूर | ३५.७ | २५.४ |
| सातारा | ३१.२ | २१.२ |
| सांगली | ३१.६ | २३.१ |
| सोलापूर | ३६.१ | २५.४ |
| वर्धा | ३८.१ | २६.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** नवीन कामाचा आरंभ करण्यास व्यावसायिक प्रदर्शने भरविता येतील. थोरामोठयांचे चांगले सहकार्य लाभेल.

**तुळ :** आपल्या वाक्चातुर्याने दुसऱ्यांची मने जिंकून ध्येयपूर्ती कराल. अनावश्यक खर्चाचे प्रमाण वाढेल.

**वृषभ :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. महिलांनी जपजाप्याकडे जास्त लक्ष द्यावे. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे.

**वृश्चिक :** सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल. विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळेल. जनसंपर्कातून चांगला फायदा होईल.

**मिथुन :** स्वकष्टाचा पैसा मिळेल. तसाच खर्चही वाढेल. दूरच्या प्रवासाचे योग येतील. आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील.

**धनु :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. एकमताने निर्णय घ्याल.

**कर्क :** एखादी गोष्ट आपण निश्चित करु शकू हा विश्वास वाटेल.आपल्या वाक्चातुर्याच्या जोरावर मोठी मजल माराल. नोकरीत पदोन्नती होईल.

**मकर :** व्यावसायिक वादंग टाळावेत. आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे.

**सिंह :** एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकाराल. उद्योगातून चांगली प्राप्ती होईल. इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल.

**कुंभ :** व्यवसायीक उद्योगातील कामानिमित्त कर्ज प्रकरण रखडले असेल तर ते मार्गी लागेल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील. अंध:श्रद्धेला बळी पडू नका.

**कन्या :** कामाची आखणी नियोजनबद्ध केल्यामुळे व्यावसायिक उत्कर्ष साधता येईल. प्रतिष्ठित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**मीन :** अचनाक अनावश्यक खर्च उद्भवतील. मानसिक ताणतणाव जाणविण्याची शक्यता राहते. पूर्वनियोजित प्रवासात विलंब होण्याची शक्यता आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| २९जुलै २०२६ | करण:विष्टि ०७:१४:४८ |
| बुधवार | करण:बव २०:०५:२८ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कर्क |
| आषाढ शके | चन्द्र:मकर |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – सफर |
| अयन– दक्षिणयन | तारीख – १४ |
| मास– आषाढ | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | आषाढ पौर्णिमा |
| शुक्ल पक्ष | गुरुपौर्णिमा |
| तिथि:पूर्णिमा २०:०५:२८ | व्यासपूजा संन्यासिजनांचा |
| नक्षत्र:उत्तराषाढा | चातुर्मास्यारंभ |
| १५:३६:५१ | पोर्णिमा समाप्ती |
| योग:प्रीति २३:५७:०३ | रात्रौ ८.०४ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पोलीस बंदोबस्तातील कृष्णा आंदेकर, वाडेकर बंधूंचा पाठलाग;

पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील गुन्हेगारी विश्वात खळबळ उडवणारी घटना उघडकीस आली आहे. आंदेकर टोळीने केलेल्या आयुष कोमकर आणि गणेश काळे यांच्या खुनाचा, तसेच अक्षय म्हस्केवरील प्राणघातक हल्ल्याचा बदला घेण्याच्या उद्देशाने रचलेला कट पुणे पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणात गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वेदांत रोहित सावंत (वय २१) आणि अथर्व दत्तात्रय खोपडे (वय २१) यांना अटक केली असून, सुरज अशोक ठोंबरे (वय २४), मानव शरद ढमाले (वय २४) आणि धीरज लखारा यांच्याविरोधातही भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक तेजश्री पवार यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अक्षय म्हस्के यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी तुरुंगात असलेल्या कृष्णा आंदेकर, स्वराज वाडकर आणि तुषार वाडकर यांना पुणे पोलिसांनी शिवाजीनगर न्यायालयात हजर केले होते. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या तिघांना पोलीस वाहनातून धुळे आणि नंदुरबारकडे नेण्यात येत होते. याचवेळी अथर्व खोपडे, वेदांत सावंत आणि धीरज लखारा हे तिघे दुचाकीवरून पोलिसांच्या ताफ्याच्या मागे लागल्याचे तपासात समोर आले आहे. शिवाजीनगरपासून चाकणपर्यंत त्यांनी पोलीस वाहनांचा सातत्याने पाठलाग केला.

### अजितदादांच्या अपघाताला ६ महिने पूर्ण; अजूनही उत्तर नाही, संयम सुटतोय

पुणे : दैनिक संध्या

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला सहा महिने झाले आहेत. पण, अजूनही अपघाताच्या चौकशीचा अहवाल समोर आलेला नाही. यावरुन आज युगेंद्र पवार यांनी संताप व्यक्त केला. "दादांना जाऊन सहा महिने झाले, पण अजूनही काहीच निष्पन्न झाले नाही याची मोठी खंत आहे," असे सांगत युगेंद्र पवार यांनी संताप व्यक्त केला. अजितदादांच्या दुर्दैवी निधनानंतर केंद्र व राज्य सरकारमधील अनेक बड्या नेत्यांनी आणि प्रशासनाने सखोल चौकशीची आश्वासने दिली होती. सीआयडी आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय या प्रकरणी तपास करत आहेत. मात्र, इतका काळ उलटूनही अपघाताचे साधे व्हिडीओ किंवा CCTV फुटेजही समोर आलेले नाही, असा गंभीर आरोप युगेंद्र पवारांनी केला आहे. "व्हीएसआर कंपनीच्या मालकावर अद्याप कोणतीही कठोर कारवाई झालेली नाही आणि चौकशीही अपेक्षित वेगाने होत नाहीये," असा थेट आरोप पवार यांनी केला. "आम्ही सरकारला पुरेसा वेळ दिला आहे, पण आता आमचा संयम सुटत चालला आहे. त्या दिवशी बारामतीत नेमके काय घडले? याचे उत्तर आम्हाला हवेच आहे, असेही युगेंद्र पवार म्हणाले. "अजित दादांना जाऊन सहा महिने होत आहेत. सहा महिने कसे गेले हे कळलेच नाही. पहिल्या दिवसापासून आमच्या सगळ्यांची मागणी आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणाचा पहिल्या महिन्याभरात प्राथमिक अहवाल आला, पण तो आम्हाला पटलेला नाही. त्यात अनेक मुद्दे चुकीचे आहेत, असेही पवार म्हणाले.

### ५० मीटरच्या अंतरावर २५ खड्डे, मग पुणे शहरात फक्त ५४ खड्डे कसे?

पुणे : दैनिक संध्या

नवी पेठेतील विठ्ठल मंदिर ते गांजवे चौक या रस्त्यावरील अवघ्या ५० मीटरच्या पट्ट्यातच सुमारे २५ खड्डे आहेत, मग संपूर्ण शहरात फक्त ५४ खड्डे कसे, असा सवाल सजग नागरिक मंचाने उपस्थित केला आहे. याबाबत मंचाने पथ विभागाच्या फसव्या दाव्याची महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे. शहर व परिसरात मागील काही दिवसांत झालेल्या पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांच्या अंदाज येत नाही. परिणामी वाहने आदळून बंद पडतात. पावसाने उघडीप दिल्यानंतर महापालिकेच्या पथ विभागाने पंधरा दिवसांत शहरातील ११८८ खड्ड्यांपैकी ११३४ खड्ड्यांची दुरुस्ती केल्याचा व केवळ ५४ खड्डे असल्याचा दावा केला होता.

### ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य

पुणे : दैनिक संध्या

ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि शैक्षणिक साहित्याअभावी त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोसलेवाडी तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. या वेळी स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशनचे आकाश जाधव, वंदना वशिष्ठ आणि रूपाली लाहोटी उपस्थित होते. भोसलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक समद पठाण, दिपाली माळी, राजेंद्र जगताप, सचिन गुंड आणि अमोल भोसले उपस्थित होते. तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथील मुख्याध्यापक सतीश कदम, नेवसे सर, मारुती पवार, दीपक थोरात, गाडेकर सर आणि रत्नपारखी मॅडम यांची उपस्थिती होती. या उपक्रमासाठी अविरत फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमाताई लाळगे तसेच सदस्य त्रिशाला वर्मा, अनोद गोस्वामी, दीपक फुलझेले, सचिन कुंभार आणि गणेश गोंजारे यांनी विशेष सहकार्य केले.

### हृदयस्पर्शी कवितांवर आधारित 'करम – नक्षत्रम्' कार्यक्रमाचे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

करम प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्राच्या विविध भागातील कवयित्रींच्या हृदयस्पर्शी कवितांच्या 'करम – नक्षत्रम्' या विशेष कार्यक्रमाचे रविवार, दि. २६ जुलै रोजी आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम सकाळी ११ वाजता अक्षरवेल सभागृह, सदाशिव पेठ येथे होणार आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक भूषण कटककर, प्रज्ञा महाजन यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रमात अमिता पैठणकर, मुक्ता भुजबले-ताम्हनकर, वीणा डोंगरवार, अश्विनी जगताप, गीता भावसार यांचा सहभाग आहे. प्राजक्ता वेदपाठक, वैजयंती आपटे, वासंती वैद्य, चिन्मयी चिटणीस अनुभवकथन करणार आहेत. या कार्यक्रमात डॉ. विद्यागौरी लेले, प्रणिता श्रोत्री, म. भा. चव्हाण, डॉ. बाबुल पठाण, ॲड. प्रमोद आडकर, ज्योत्स्ना चांदगुडे, धनंजय तडवळकर, प्रभा सोनवणे, स्मिता जोशी-जोहरे, प्रा. शैलजा किंकर, रोहिणी ताकवले, प्रभा दळवी यांचा सन्मान केला जाणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## आषाढी वारी २०२६ दरम्यान एलपीजी सुरक्षा जनजागृती अभियानाला प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या आषाढी वारी २०२६ दरम्यान एचपीसीएलच्या पुणे एलपीजी प्रादेशिक कार्यालयाने राबविलेल्या एलपीजी सुरक्षा जनजागृती अभियानाला लाखो वारकरी, स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी आणि संत तुकाराम महाराज पालखी या दोन्ही पालख्यांसोबत एचपीसीएलची दोन एलपीजी सुरक्षा जनजागृती वाहने संपूर्ण वारी मार्गावर कार्यरत होती. या वाहनांवरील एलईडी स्क्रीनद्वारे मराठी भाषेत एलपीजी सुरक्षिततेवरील माहितीपट व जनजागृतीपर चित्रफिती सातत्याने प्रदर्शित करण्यात आल्या. याशिवाय, मार्गावरील विविध शहरांमध्ये व गावांमध्ये एचपी गॅस वितरकांच्या सहकार्याने मोबाईल सेफ्टी क्लिनिक आयोजित करण्यात आले. या माध्यमातून सुरक्षित एलपीजी वापर, गॅस गळती प्रतिबंध, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी तसेच प्रत्यक्ष सुरक्षा प्रात्यक्षिकांद्वारे नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानाद्वारे हजारो वारकरी व नागरिकांपर्यंत थेट पोहोचून घरगुती एलपीजीचा सुरक्षित वापर, गॅस गळतीची ओळख आणि अपघात प्रतिबंधाबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. या अभिनव उपक्रमातून एचपीसीएलच्या पुणे एलपीजी प्रादेशिक कार्यालयाने सार्वजनिक सुरक्षा, ग्राहक जनजागृती आणि समाजहिताप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली. महाराष्ट्राच्या सर्वात मोठ्या धार्मिक यात्रेदरम्यान राबविण्यात आलेल्या या अभियानाचे वारकरी, स्थानिक नागरिक आणि एचपी गॅस वितरकांनी मोठ्या प्रमाणावर स्वागत व कौतुक केले.



## 'नारी शक्ती महोत्सव २०२६'मधून महिला सक्षमीकरण, संस्कृती आणि कलेचा त्रिवेणी संगम

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने, समरसता साहित्य परिषद यांच्या सहकार्याने तसेच आमदार उमाताई खापरे यांच्या पुढाकारातून 'नारी शक्ती महोत्सव २०२६' अंतर्गत २७ वा स्वरसागर सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सोमवार, दि. २७, २८ व २९ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी १०.३० वाजल्यापासून रामकृष्ण मोरे नाट्यगृह, चिंचवड, पुणे येथे विविध सांस्कृतिक, संगीत, नृत्य आणि भक्तिपर कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन मा. मंत्री सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास, महाराष्ट्र राज्य ॲड. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते होणार असून, विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा सांस्कृतिक सोहळा संपन्न होणार आहे. "नारी शक्ती – समाज शक्ती – राष्ट्र शक्ती" या संकल्पनेवर आधारित या महोत्सवातून महिलांच्या कर्तृत्वाचा, सर्जनशीलतेचा आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी, सोमवार दि. २७ जुलै रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत भव्य भजनी सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ७.०० वाजता नूपुर नृत्यालय यांच्या वतीने डॉ. सौ. सुमेधा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'नृत्य गाथा (भक्ती, शक्ती, संस्कृती)' हा विशेष नृत्याविष्कार सादर केला जाणार आहे. सायंकाळी ७.३० वाजता सुप्रसिद्ध गायिका सावनी रवींद्र आणि सहकलाकार 'भाव सप्तक' यांच्या 'सावन सरी' या पावसावर आधारित मराठी व हिंदी गीतांच्या कार्यक्रमाने रसिकांना सुरेल संगीताची पर्वणी अनुभवता येणार आहे.मंगळवार, दि. २८ जुलै रोजी पारंपरिक भव्य मंगलागौरी सादरीकरण होणार आहे. सायंकाळी ७.०० वाजता सुवर्णा बाग यांच्या शिष्यांचा नृत्यांजली कार्यक्रम सादर केला जाईल. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता सुप्रसिद्ध गायिका विदुषी सानिया पाटणकर यांचा अभंग व शास्त्रीय संगीतावर आधारित गायनाचा कार्यक्रम रंगणार आहे. बुधवार, दि. २९ जुलै रोजी सायंकाळी ४.३० वाजता लोकप्रिय गायिका व अभिनेत्री केतकी माटेगावकर यांचा विशेष गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या सुरेल मैफलीने महोत्सवाची सांगता होणार आहे. महिलांच्या कलागुणांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, भारतीय संस्कृतीतील समृद्ध परंपरांचे जतन व संवर्धन करणे तसेच संगीत, नृत्य आणि भक्तीपर कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, संस्कारमूल्ये आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ करणे, या उद्देशाने मा. मंत्री सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास, महाराष्ट्र राज्य ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

## खडकवासलासह अनेक धरणे १०० टक्के भरली

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यात होणाऱ्या मुसळधार आणि संततधार पावसाने अनेक धरणं १०० टक्क्यांच्या आसपास भरल्याचे जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीवरून दिसते आहे. २८ जुलै २०२६ च्या अहवालानुसार धरणांमध्ये यंदाच्या पावसाळ्यात समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे. खोऱ्यातील अनेक प्रमुख धरणे १०० टक्के भरली असून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

कळमोडी (१.५१ टी.एम.सी.), आंद्रा (२.९२ टी.एम.सी.), खडकवासला (१.९७ टी.एम.सी.) आणि वीर धरण (९.४१ टी.एम.सी.) १०० टक्के भरली आहेत. तर सोलापूरची वाहिनी मानले जाणारे उजनी धरण ९९.७८% भरले असून त्यात ५३.४६ टी.एम.सी. उपयुक्त पाणीसाठा जमा झाला आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पाची एकूण टक्केवारी ९१.४७% वर पोहोचली असून प्रकल्पात एकूण २६.६६ टी.एम.सी. पाणी उपलब्ध आहे. यामध्ये भामा आसखेड (९८.२३%), पानशेत (९६.४७%), वरसगांव (८९.९०%) आणि टेमघर (७७.९८%) या धरणांचा समावेश आहे.

तसेच पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागवणारे पवना धरण ९५.५४% (८.१३ टी.एम.सी.) भरले आहे. याशिवाय घोड (९७.७८%), येडगांव (९७.४२%), चासकमान (९७.३३%), डिंभे (९१.५४%), भाटघर (८५.०७%) आणि मुळशी धरण (८६.५८%) यातही मुबलक साठा झाला आहे. माणिकडोह (५१.०१%) आणि पिंपळगांव जोगे (४२.४३%) या धरणांमध्ये अजूनही पाणीसाठा मध्यम स्वरूपाचा आहे. धरण क्षेत्रात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत असून प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. खोऱ्यातील अनेक प्रमुख धरणे १०० टक्के भरली असून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

## भर पावसात रंग काम, पावसाने वाहून गेला 'चुना';

■ पुणे (दै. संध्या)

भर पावसात भिंत रंगविण्याचे काम सुरू करून महापालिकेला चुना लावण्याचे काम सुरू असल्याचा प्रकार मार्केटयार्ड परिसरात उघडकीस आला आहे. पावसामुळे रंगकामासाठी भिंतीला मारलेला पांढरा रंग वाहून गेल्याचे फोटो समोर आले असून, याचा प्रशासनाला थांगपत्ता नसल्याचेही समोर आले.

भारत सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेसाठी शहरातील भिंती रंगवून सुशोभीकरण करण्याचे काम मागील काही वर्षांपासून सुरू आहे. विविध कारणांसाठी निधी खर्च करून त्यात टक्केवारी मिळवण्यासाठी खटाटोप करणाऱ्या नगरसेवकांना भिंती रंगवण्याचे काम एक नवीन संधी मिळालेली आहे. त्यामुळे भिंती रंगवण्यासाठी नगरसेवकांची एक प्रकारे स्पर्धा सुरू असल्याचे पाहायला मिळते. बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रभाग क्रमांक २१ मुकुंदनगर-सॅलिसबरी पार्क येते. आदिनाथ सोसायटीच्या मागे भर पावसात भिंतींवर रंगकाम केले जात असल्याचा प्रकार समोर आला. या ठिकाणी चुना लावला जात होता. पण पावसामुळे हा चुना निघून रस्त्यावर वाहत असल्याचे चित्र समोर आले.

हा प्रकार या भागातील भारत सुराणा यांनी उजेडात आणला आहे. ते म्हणाले, 'महापालिकेच्या पैशाची भर पावसात उधळपट्टी केली जात आहे. नगरसेवकांना आपण कशा पद्धतीने काम करत आहोत याचे भान राहिलेले नाही. या कामाचे पैसे ठेकेदाराला देऊ नयेत.

बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्त शीतल वडके म्हणाल्या, 'प्रभाग क्रमांक २१ मध्ये भिंत रंगविण्यासाठी कोणतीही परवानगी दिलेली नाही. तसेच निधीदेखील दिलेला नाही. तरीही हे काम कोणातर्फे चालले आहे, याची माहिती घेतली जाईल.

## दैनंदिन जीवन अधिक सुंदर बनवणाऱ्या 'शांत लक्झरी'च्या कालातीत वस्तू

आजच्या आधुनिक जीवनशैलीत लक्झरीची व्याख्या झपाट्याने बदलत आहे. केवळ भपकेबाज सजावटीपेक्षा साधेपणा, दर्जा आणि उपयुक्तता यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. याच संकल्पनेला साकार करणारे फॅबइंडियाचे कालातीत होम कलेक्शन "क्वाएट लक्झरी" म्हणजेच शांत, सुसंस्कृत आणि प्रामाणिक जीवनशैलीचा अनुभव देणारे ठरत आहे.

हस्तकला आणि आधुनिक डिझाइनचा सुंदर संगम असलेल्या या वस्तू घराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच दैनंदिन वापरासाठीही उपयुक्त आहेत. या कलेक्शनमधील ब्राऊन ऑलिव्हर मँगो वूड कोट स्टँड (एमआरपी ₹11,499) हा आकर्षक आणि टिकाऊ आंब्याच्या लाकडापासून तयार करण्यात आला आहे. 46 x 46 x 165.5 सेंमी आकाराच्या या फ्लोअर हँगरला मजबूत बेस असल्याने तो स्थिर राहतो. वरच्या आणि मध्यभागी दिलेले हुक्स कोट, टोपी, बॅग तसेच दैनंदिन वापरातील वस्तू टांगण्यासाठी उपयुक्त आहेत.

बेडरूम किंवा घराच्या प्रवेशद्वाराला हा स्टँड आधुनिक आणि देखणा लूक देतो. साईड टेबल आणि सिरेमिक फुलदाणीसोबत त्याची मांडणी केल्यास घराचा लूक अधिक आकर्षक दिसतो. याच कलेक्शनमधील आहान फ्लोअर लॅम्प (शेडशिवाय) (एमआरपी ₹12,999) हा घरातील प्रकाशयोजनेला नवी ओळख देणारा आहे.

हाताने रंगविलेला लाकडी बेस असलेला हा लॅम्प लिव्हिंग रूम किंवा वाचनाच्या कोपऱ्यात उबदार, शांत आणि आमंत्रक वातावरण निर्माण करतो. आरामदायी खुर्ची, टेक्स्चर असलेले थ्रो आणि काही निवडक पुस्तकांसह हा लॅम्प ठेवला तर घरात एक सुंदर आणि प्रेरणादायी वाचनाचा कोपरा सहज तयार होऊ शकतो. घर सजवताना कमी पण दर्जेदार वस्तूंची निवड करून सौंदर्य, उपयुक्तता आणि शांततेचा अनुभव देणारी जीवनशैली स्वीकारू इच्छिणाऱ्यांसाठी फॅबइंडियाचे हे "क्वाएट लक्झरी" कलेक्शन एक उत्तम पर्याय ठरत आहे.



## महाराजस्व अभियाना' अंतर्गत समाधान शिबीरात ८१६ लाभार्थ्यांना थेट लाभ

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभाग, जिल्हा प्रशासन आणि आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्व शासकीय यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, (२७ जुलै) रोजी शिवगिरी मंगल कार्यालय, मचर येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत विधानसभा मतदारसघस्तरीय भव्य 'समाधान शिबीर पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीपराव वळसे पाटील उपस्थित होते. यावेळी आबेगाव व शिरूरचे उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्याचे तहसीलदार आणि गटविकास अधिकारी, खेड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी , तालुका कृषी अधिकारी, तालुका बालविकास अधिकारी तसेच आदिवासी विकास विभागाचे अधिकारी याची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. पाटील म्हणाले, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत जलद गतीने आणि एकाच छताखाली पोहोचावा, हा या समाधान शिबीराचा मुख्य उद्देश आहे. सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांचे प्रश्न प्रशासनाने तत्परतेने सोडवून त्याना शासकीय सेवाचा थेट लाभ द्यावा, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले. मागील कार्यक्रमामध्ये आंबेगाव तालुक्यातील ९,७१८ आणि शिरूर तालुक्यातील ५,१५० नागरिकाना विविध शासकीय योजनाचा लाभ मिळाला होता. याच साखळीत आज पार पडलेल्या शिबीरामध्ये दोन्ही तालुक्यांतील एकूण ८१६ लाभार्थ्यांना थेट सेवा व दाखल्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये आबेगाव पंचायत समितीच्या माध्यमातून घरकुल, बचत गट, शिक्षण, रोजगार हमी व पशूसंवर्धन विभागातील २७१ लाभार्थी, तर शिरूर पंचायत समितीमार्फत ७५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. याशिवाय आरोग्य विभागामार्फत १८२, संजय गांधी निराधार योजना, महसूल व निवडणूक शाखेतून १२५, कृषी विभागाकडून ५६, महा ई-सेवा केंद्राद्वारे ३९, महिला व बालविकास विभागातर्गत २८, प्रकल्प अधिकारी घोडेगाव (आदिवासी विकास) १५, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ८, भूमी अभिलेख ३ आणि इतर ११ अशा विविध सेवांचा समावेश असून सर्व स्टॉल्सच्या माध्यमातून नागरिकाच्या समस्यांचे एकाच छताखाली निवारण करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### फेसबूकने PM मोदींचा व्हिडीओ हटवला, अखेर Meta ने मागितली माफी

**नवी दिल्ली : दैनिक संध्या**

गेल्या आठवड्यात दिल्लीत सुरू असलेलं विद्यार्थ्यांचं आंदोलन अधिकच तीव्र झालं असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुण आणि विद्यार्थ्यांना उद्देशून एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. मात्र फेसबूकने हा व्हिडीओ अचानक डिलिट केल्याने खळबळ उडाली होती. गेल्या आठवड्यात दिल्लीत सुरू असलेलं विद्यार्थ्यांचं आंदोलन अधिकच तीव्र झालं असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुण आणि विद्यार्थ्यांना उद्देशून एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. मात्र फेसबूकने हा व्हिडीओ अचानक डिलिट केल्याने खळबळ उडाली होती. तसेच याबाबत केंद्र सरकारने जोरदार आक्षेप घेतला होता. त्यानंतर मेटाने हा व्हिडीओ रिस्टोअर केला असून, याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ चुकून ब्लॉक झाला होता, असे मेटाने सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा व्हिडीओ हटवण्यात आल्याबाबत स्पष्टीकरण देताना मेटाच्या प्रवक्त्याने सांगितले की, तो व्हिडीओ चुकीने हटवण्यात आला होता. तो व्हिडीओ रिस्टोअर करण्यात आला आहे. एका तांत्रिक चुकीमुळे हा प्रकार घडला होता, असे स्पष्टीकरणही मेटाच्या प्रवक्त्याने दिले आहे.

### फॉर्म्युला रेसिंग स्पर्धेचे वीज बिल प्रकरण, 'ते' २ कोटी रुपये वसूल करू

**पणजी : दैनिक संध्या**

फॉर्म्युला-४ मोटर स्पोर्ट्स स्पर्धेसाठी वापरलेल्या वीज बिलाचे दोन कोटी रुपये कंपनीकडून वसूल करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या वित्त खात्याने घेतला असून तशी प्रक्रियाही सुरू झाली आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सोमवारी बोलताना ही माहिती दिली. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, 'वीज बिलाचे दोन कोटी रुपये सरकारने मुळीच माफ केलेले नाहीत. हे सर्व पैसे वसूल केले जातील. वित्त खात्याने तसा स्पष्ट निर्णय घेतलेला आहे. करारानुसारच सर्व गोष्टी होतील. दरम्यान, मोपा येथे आयोजित फॉर्म्युला-४ मोटरस्पोर्टस स्पर्धेला सुमारे २ कोटींच्या वीजबिलाला दिलेल्या कथित माफीवरून राज्यात वाद निर्माण झाला होता. यावर सोमवारी दुपारी वीजमंत्री सुदिन ढवळीकर यांनी हा निर्णय मी घेतलेला नसल्याचे सांगितले होते. दरम्यान, मंत्री सुदिन ढवळीकर यांनी यावेळी प्रस्तावित आयआयटी प्रकल्पाविषयी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, 'ग्रामसभेतील ठराव हा जनमताचा एक भाग असला तरी तो सरकारवर बंधनकारक नसतो. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने उपलब्ध जमीन, कायदेशीर बाबी आणि लोकभावना या सर्वांचा विचार करून सरकार अंतिम निर्णय घेईल. तसे आधीच स्पष्ट केले आहे. यापूर्वीही ढवळीकर यांनी फर्मागुडीतील प्रस्तावित जागा ही अनेक दशकांपासून सरकारी मालकीची असल्याचा दावा केला होता. तसेच, प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक धार्मिक स्थळे किंवा तेथील प्रवेशमार्ग बाधित होणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. गोव्यात आयआयटी गोवासाठी कायमस्वरूपी कॅम्पस उभारण्याचा विषय गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहे. फर्मागुडी येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरालगतच्या सरकारी जमिनीला केंद्राने मंजुरीही दिली आहे. मात्र, या प्रस्तावाला स्थानिक नागरिक, काही सामाजिक संघटना आणि पर्यावरणप्रेमींकडून विरोध करण्यात आला. रविवारी झालेल्या बांदोडा ग्रामसभेत विरोधाचा ठराव मंजूर करण्यात आला. दुसरीकडे, राज्यातील उद्योग, उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या दृष्टीने आयआयटीचा कायमस्वरूपी कॅम्पस गोव्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सरकारचे मत आहे.

### आमदार वीरेश बोरकर यांची आरजीतून ‘हकालपट्टी’

**पणजी : दैनिक संध्या**

रिव्होल्यूशनरी गोवन्स पक्षाने आमदार वीरेश बोरकर यांचे पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व निलंबित करत तत्काळ प्रभावाने हकालपट्टी करण्यात आल्याची घोषणा केली आहे. पक्षाच्या अधिनियमातील तरतुदींनुसार आणि त्यांच्याबाबत चालविलेल्या शिस्तभंग कारवाईची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे पक्षाचे सरचिटणीस विश्वेश नाईक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. पक्षाच्या या निर्णयानंतर वीरेश बोरकर यांचा पक्षाशी कोणताही संबंध राहिलेला नसून, त्यांनी स्वतःची ओळख पक्षाचे सदस्य, पदाधिकारी, प्रवक्ते, अधिकृत प्रतिनिधी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपातील कार्यकर्ते म्हणून करून देऊ नये, असे स्पष्ट निर्देश सरचिटणीस नाईक यांनी दिले आहेत. तसेच, पक्षाच्या नावाने कोणतेही पत्र, प्रसिद्धीपत्रक, निवेदन, आदेश किंवा इतर कोणताही अधिकृत पत्रव्यवहार जारी करू नये, असेही पक्षाने बजावले. यापुढे आमदार बोरकर यांनी पक्षाच्या नावाने जारी केलेले कोणतेही निवेदन किंवा पत्रव्यवहार अनधिकृत, बेकायदेशीर आणि पक्षावर बंधनकारक नसल्याचे मानले जाईल, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, सोमवारी यावर अजय खोलकर म्हणाले की, 'पक्षात राष्ट्रीय अध्यक्ष असे अधिकृत पद नाही. त्यामुळे वीरेश यांनी कार्यालय सील करण्याचा व प्रवेश बंदीचा काढलेला आदेश पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

### आयपीबीच्या बैठकीत तब्बल ६२२ कोटींच्या उद्योगांना मंजुरी

**पणजी : दैनिक संध्या**

: मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या (आयपीबी) ४२ व्या बैठकीत ६२२ कोटींचे उद्योग मंजूर करण्यात आले. यातून अंदाजे ३,१८० नोकऱ्या निर्माण होणार आहेत. बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. मंजूर प्रकल्प उत्पादन, आदरातिथ्य, शिक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, जहाजबांधणी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांशी संबंधित आहेत. मुख्यमंत्री सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उद्योगमंत्री माविन गुदिन्हो, जीआयडीसीचे अध्यक्ष आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स तसेच बोर्डाचे सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, 'या गुंतवणुकीमुळे गोवा शाश्वत आणि उच्च मूल्याच्या उद्योगांसाठी आकर्षक केंद्र म्हणून अधिक मजबूत होईल. मंजूर प्रकल्पांमध्ये ऑटोमोबाइल घटक निर्मिती, ऑप्टिकल उपकरणे उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स व तंत्रज्ञान विकास केंद्रे, प्रगत फॅब्रिकेशन युनिट्स, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर पायाभूत सुविधाचा समावेश आहे.'

# “राम मंदिरात भाविकांची संख्या घटली नाही”

## कोर्टाचा निर्णय आमच्या बाजूने येईल”; कोणाचा दावा?

■ आयोध्या (दै. संध्या)

राम मंदिरातील दान चोरी प्रकरणात नवे ट्विस्ट येत आहेत. एकीकडे उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेले विशेष तपास पथक कसून तपास करत आहेत. तर दुसरीकडे श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्ट यांनी राम मंदिर व्यवस्थेत मोठे बदल केले आहेत. याबाबत नवनवे खुलासे होत असताना, राम मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झालेली नाही. तसेच न्यायालयाचा निकाल आमच्या बाजूने लागेल, असा दावा करण्यात आला आहे.

राम मंदिर ट्रस्टचे सदस्य दिनेंद्र दास म्हणाले की, भाविकांना सहज दर्शन मिळत आहे. विधी योग्य रीतीने पार पाडले जात आहेत आणि भाविकांची कमतरता नाही. उलट अयोध्येत राम भक्तांची संख्या वाढत आहे, असे त्यांनी सांगितले. दान चोरी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीचे स्वागत दास यांनी केले आहे. तसेच सखोल तपासासाठी नवीन विशेष तपास पथक स्थापन करण्यास पाठिंबा दिला. राम मंदिराचे जवळपास ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. आता त्यात सुधारणाही केल्या जातील. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आपल्याला लक्षणीय सुधारणा दिसून येईल. या प्रकरणात काय घडत आहे आणि काय घडत नाही, याची अयोध्येतील लोकांना पूर्ण कल्पना आहे. व्यवस्था सुधारली जात आहे. काही शंका असल्यास, एसआयटी तपास करेल. ते तपासात सहकार्य करतील, ज्यामुळे भविष्यातील कोणत्याही समस्या टाळता येतील, असे दास यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राम मंदिरासाठीच्या दान चोरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालय चार याचिकांवर सुनावणी घेणार आहे. या सुनावणीपूर्वी अयोध्येतील संतांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रहिताचा असेल. सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीवर जगद्गुरू परमहंस आचार्य म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात जे काही होईल ते देशासाठी आणि त्याच्या संस्कृतीसाठी चांगलेच असेल. सर्वोच्च न्यायालय हे न्यायाचे सर्वांत मोठे मंदिर आहे.



### वॉटरवर्ल्ड इंडियाचा पुण्यात तीन दिवसीय जनजागृती उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक आरोग्य संघटना यांच्या पुढाकाराने दरवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या “जागतिक बुडणे प्रतिबंध दिन” निमित्त वॉटरवर्ल्ड इंडियाच्या वतीने पुण्यात तीन दिवसीय “बुडणे प्रतिबंध जनजागृती अभियान” यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. हा उपक्रम वॉटरवर्ल्ड इंडियाच्या वॉटरवर्ल्ड अॅक्वाटिक क्लब, खराडी, वॉटरवर्ल्ड स्विम स्कूल, वडगाव शेरी आणि वॉटरवर्ल्ड ट्रेनिंग सेंटर, घोरपडी या तीन केंद्रांवर पार पडला. या अभियानामध्ये १५० हून अधिक नागरिक, विद्यार्थी, पालक आणि जलतरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश बुडण्याच्या घटनांविषयी जनजागृती करणे, पाण्याजवळ सुरक्षित



वर्तनाची माहिती देणे, पोहण्याचे महत्त्व पटवून देणे तसेच प्रत्येक नागरिकामध्ये जलसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. यावेळी वॉटरवर्ल्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय कुमार साह यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बुडणे ही एक गंभीर परंतु पूर्णपणे टाळता येण्यासारखी दुर्घटना आहे. योग्य वेळी मिळणारे प्रशिक्षण, पोहण्याचे ज्ञान, पाण्यात स्वतःचा बचाव करण्याची कौशल्ये आणि सतर्कता यांच्या माध्यमातून अनेक मौल्यवान जीव वाचविता येऊ शकतात.

ते पुढे म्हणाले, “पाणी हे जीवन आहे, परंतु योग्य ज्ञान आणि सुरक्षिततेची जाणीव नसल्यास ते धोकादायकही ठरू शकते. प्रत्येक बालक, युवक आणि नागरिकाने पोहणे व मूलभूत जलसुरक्षा कौशल्ये आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. जनजागृती आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपण बुडण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो. प्रत्येकाने जलसुरक्षेचा संदेश समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा.”

### अपोलो हॉस्पिटल्समध्ये रोबोटिक-सहाय्यित हृदय बायपास शस्त्रक्रिया यशस्वी

■ पुणे (दै. संध्या)

अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे ‘दा विंची Xi’ रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणालीच्या साहाय्याने पहिली रोबोटिक-सहाय्यित कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट (सीएबीजी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. पारंपरिक हृदय बायपास शस्त्रक्रियेच्या तुलनेत कमी चिरे आणि शरीरावर कमी आघात करणाऱ्या या आधुनिक पद्धतीमुळे पुणे आणि परिसरातील हृदयरुग्णांसाठी उपचाराचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. या तंत्रज्ञानाद्वारे पहिली शस्त्रक्रिया ६७ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली. संबंधित रुग्णाला हृदयाच्या तीन प्रमुख रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे असल्याचे निदान



झाले होते. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती वेगाने सुधारली आणि चौथ्याच दिवशी त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. या पहिल्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर अवघ्या एका महिन्यात अशाच आणखी सहा रोबोटिक-सहाय्यित बायपास शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्याचे रुग्णालयाने सांगितले.

### अफेयरच्या संशयावरुन पत्नीला पंख्याला लटकवलं

■ बागलकोट (दै. संध्या)

कर्नाटकमधील बागलकोटमध्ये थरकाप उडवणारी घटना घडली आहे. प्रवीण असं आरोपी पतीचं नाव असून त्याला पत्नीचं दुसऱ्या कोणासोबत तरी अफेयर असल्याचा संशय होता. या केवळ संशयावरून त्याने आपल्या २३ वर्षांच्या पत्नीची, भाग्यश्रीची अतिशय निघृणपणे हत्या केली. प्रवीण जिगलूर याने आधी भाग्यश्रीला काठीने बेदम मारहाण केली आणि नंतर तिला पंख्याला लटकवलं. पत्नीला लटकवल्यानंतरही आरोपी पती शांत बसला नाही. त्याने तडफडणाऱ्या पत्नीचा व्हिडीओ बनवला. नराधम पतीला तिची जराही दया आली नाही. आरोपी पतीने पत्नीच्या आई-वडिलांना व्हिडीओ कॉल करून हा भयंकर प्रकार पाहण्यास भाग पाडलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नंतर त्याने हा व्हिडीओ इतर अनेक लोकांसोबत शेअरही केला. तडफडणाऱ्या पत्नीचा व्हिडीओ बनवला. नराधम पतीला तिची जराही दया आली नाही. आरोपी पतीने पत्नीच्या आई-वडिलांना व्हिडीओ कॉल करून हा भयंकर प्रकार पाहण्यास भाग पाडलं.

### सायबर सुरक्षा तंत्रज्ञान शिक्षण ही काळाची गरज : डॉ पराग काळकर

■ पुणे(दै. संध्या)

आजच्या काळामध्ये माणसाचे जीवन हे पूर्णतः तंत्रज्ञानाने व्यापून टाकलेले आहे. माणूस कुठेही गेला तरी त्याच्यासोबत मोबाईल सारखे तंत्रज्ञान कायमस्वरूपी असते. त्यामुळे, माणसाची सर्व माहिती तंत्रज्ञानाकडे असते. गुन्ह्याचे स्वरूप बदलल्यामुळे तपास यंत्रणा आणि पद्धतही बदलणे गरजेचे असून सायबर सुरक्षा तंत्रज्ञानासंदर्भात माहिती आणि शिक्षण ही आता काळाची गरज बनली आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले. ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुनीत बालन ग्रुप आणि




न्यूलिफ लाईफ स्पेसेस तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते झाले. जीएसटी विभागाच्या अपर महासंचालक वृंदाबा गोहिल, पुणे एटीएसचे एसपी संभाजी कदम, डॉ. आरती दातार, माधुरी सातपुते, लीना सातपुते, प्राजक्ता गिरी, ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीसचे प्रमुख केतन अत्रे आदी यावेळी उपस्थित होते.

### यात्रेकरूंची बस दरीत कोसळली; भाविक जखमी

■ जम्मू-काश्मीर (दै. संध्या)

गांदरबल जिल्ह्यातील हरिगनीवन येथे एक भीषण अपघात झाला आहे. अमरनाथ यात्रेकरूंना घेऊन जाणारी एक बस अनियंत्रित होऊन दरीत कोसळली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे ५० भाविक प्रवास करत होते. या दुर्घटनेत जवळपास ३९ भाविक जखमी झाले आहेत. अपघातानंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झालं. अपघाताची माहिती मिळताच सैन्य, केंद्रीय राखीव पोलीस बल (CRPF), ITBP, जम्मू-काश्मीर पोलीस, २ आसाम रायफल्स आणि २१ राष्ट्रीय रायफल्स (RR) च्या तुकड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. स्थानिक नागरिकांनीही बचावकार्यात मोलाची भूमिका बजावली. सर्व पथकांनी मिळून तातडीने रेस्क्यू ऑपरेशन राबवत जखमींना सुरक्षित बाहेर काढलं.

**ई- लिलावा अंतर्गत निविदा सूचना**

जेजुरी नगरपरिषद, ता. पुरंदर जि. पुणे

सन - २०२६-२०२७

जेजुरी नगरपरिषदेच्यावतीने मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद, जेजुरी यांचेतर्फे कर विभागाकडील आठवडा. बाजार, दैनंदिन बाजार, टपरी कर वसुली व वाहन प्रवेशकर वसुली वार्षिक टेंडर सन २०२६-२७ करिता ई-लिलाव पद्धतीने मागविण्यात येत असुन त्याचा सर्व तपशील महाराष्ट्र शासनाच्या www.eauction.gov.in या संकेतस्थळांवर दिनांक २९/०७/२०२६ पासून ते ०५/०८/२०२६ पर्यंत भरण्यास उपलब्ध आहे.

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र.जेनपा/कावि/१७३७/२०२६
दिनांक : २८/०७/२०२६

शिक्का

सही/-
(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे कार्यालय**

**व्हीडीओ छायाचित्रीकरणासाठी कॅमेरा, कॅमेरामनसह फोटोग्राफीचे कामकाज भाड्याने पुरवठा करणेकामी निविदा सुचना**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
निवडणूक शाखा
पीईई-1A/कावि/ /2026
दि. /07/2026

पुणे जिल्हामध्ये आगामी कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोग, भारत सरकार व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार होणाऱ्या सर्व आगामी निवडणूक कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणुकांच्या पुर्व तयारी व SIR कार्यक्रमा करीता जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, व जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्रधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी निवडणूक व इतर अनुषंगिक कामाकाजासाठी व्हीडीओ छायाचित्रीकरणासाठी कॅमेरा, कॅमेरामनसह फोटोग्राफीचे कामकाज ‘भाड्याने पुरवठा करणेकामी व इतर अनुषंगिक कामासाठी’ अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडुन विहीत नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**निविदेच्या कामाचा तपशील :**

पुणे जिल्ह्यातील आगामी कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोग, भारत सरकार व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशानुसार लोकसभा, विधानसभा व विधानपरिषद, शिक्षक व पदवीधर निवडणुक कामकाजाकरीता तसेच सदर निवडणुकांच्या पूर्व तयारीकरीता. जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी व्हीडीओ छायाचित्रीकरणासाठी कॅमेरा, कॅमेरामनसह फोटोग्राफीचे कामकाज भाड्याने पुरवठा करणेकामी ई निविदा -

**सदर निविदेची कार्यक्रम पत्रीका खालील प्रमाणे राहील.:-**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम रुपये | २०,००,०००/- (रु. वीस लाख फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | ६,०००/- (रु. सहा हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | २०,०००/- (रु. वीस हजार रू. फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकची बँक गॅरंटी) | ४०,०००/- (रु. चाळीस हजार रू. फक्त) |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | २९/०७/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | २९/०७/२०२६ ते ०४/०८/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक Pre- Tender Conference (PTC) “Pribid Meeting” दिनांक व वेळ | --/--/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | ०५/०८/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यावसायिक/दराबाबतचा लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा उघडण्यात आल्यानंतर व्यावसायिक दराच्या लिफाफा उघडण्याबाबत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुचित केली जाईल. |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे नवीन इमारत बी विंग. चौथा मजला, पुणे येथे राहील. |
| ई-निविदा संपर्क अधिकारी | श्रीम. शर्मिला गोसावी. ना. तह. दूरध्वनी क्रमांक : ८९८३५३५४८३ |

टिप :-

१. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केले जातील. केवळ त्याच निविदाधारकांच्या निविदा विचारात घेण्यात येतील. सदर निविदेची वैद्यता 120 दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त 60 दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.
२. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांनी स्वतः राखून ठेवले आहेत.
३. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकानी क्लास III डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
५. निविदाधारकाने/प्राधिकृत प्रतिनिधीने निविदा Pre-Tender Conference (PTC) उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदेबाबत काही सूचना/शंका असल्यास त्या Pre-Tender Conference (PTC) मध्ये उपस्थितीत राहून मांडाव्यात तद्नंतरच्या सुचना/शंका यांना उत्तर देणेस हे कार्यालय बांधील राहणार नाही.
६. निविदेबाबतची पुर्व बैठक वरील प्रमाणे निर्धारित दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, नवीन इमारत, बी. विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील.
७. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे उपस्थित रहावे.
८. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक, अधिकारी, पुणे

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1957



## थोडक्यात पण महत्वाचे

### विद्यार्थ्यांनी ध्येयवादी रहावे, खासदार श्रीरंग बारणे यांचा सल्ला;

**पिंपरी : दैनिक संध्या**

थेरगाव येथील श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्था आणि शिवसेना गटनेते विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या वतीने दहावी व बारावी २०२६ मध्ये माध्यमिक उच्चमाध्यमिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ५०० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. खासदार श्रीरंग बारणे आणि वीण दोघांतली हि तुटेना (आधीरा) या मराठी मालिकेतील अभिनेत्री पोर्णिमा डे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ध्येयवादी रहावे, असा सल्ला खासदार बारणे यांनी विद्यार्थ्यांना दिला. चिंचवड येथील चिंचवडे लॉन्समध्ये झालेल्या कार्यक्रमाला युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव, शिवसेना गटनेते विश्वजित बारणे, शिवसेना महिला उपनेत्या, नगरसेविका सुलभा उबाळे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख तथा नगरसेवक निलेश तरस, महिला जिल्हा संघटीका शिलाताई भोंडवे, उपजिल्हा महिला संघटीका शैलाताई निकम, जिल्हा प्रमुख राजेंद्र तरस, सागर पाचरणे, शहर संघटिका सरिता साने, माजी नगरसेविका विमल जगताप, युवती सेनेच्या श्वेता कापसे, युवती सेना जिल्हा संघटिका सायली साळवी, श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष दिलीप बोंबले पाटील, संचालक हनुमंत माळी, धनाजी बारणे, अनंत येळवंडे, दिपाली गुजर, व मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित होते. थेरगाव येथील श्री दत्तनागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, 'अतिशय स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची क्षमता ठेवावी. आई-वडील हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण देत आहेत. त्याची जाणीव ठेवून अभ्यास करावा. आताच्या काळात केवळ पदवी मिळण्यास महत्व देऊ नये, बौद्धिक, व्यावसायिकही ज्ञान घेतले पाहिजे. शिक्षणाला मर्यादा नाही. गुणांच्या टक्केवारीत वाढ झाली आहे. प्रत्येकाच्या अंगात काही, तरी सुप्त गुण असतात. कला असते. ते ओळखून ध्येय ठेऊन वाटचाल करावी. ध्येयवादी रहावे. त्यादृष्टीकोनातून शिक्षण निवडावे आणि त्यात यश मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत'. विश्वजीत बारणे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच खेळ अध्यात्माला महत्व द्यावे. आपण कोणते क्षेत्र निवडावे हे आपण स्वत: ठरवावे. सायन्स, इंजिनियरी, कला, वाणिज्य या कोणत्याही क्षेत्राची निवड करावी. प्रत्येक क्षेत्रात चांगल्या संधी आहे. पण आपणास काय करावयाचे ते ठरावा. झोकून देवून अभ्यास करा. आपल्यासाठी आपल्या घरातील सर्वांचे कष्ट त्यामागे असतात, त्यांना विसरू नका'. 'उतीर्ण विद्यार्थ्यांमध्ये मुलींची सख्या जास्त आहे. खासकरून मुलीनी स्वसंरक्षणवर भर द्यावा, असे सुलभा उबाळे म्हणाल्या. पोर्णिमा डे यांनी संस्थेच्या वतीने असा उपक्रम दरवर्षी घेतला जातो, त्याबद्दल कौतुक केले, संस्थेचे आभार मानले. मी शिक्षण घेत असताना टॉपर होते. मला कला क्षेत्राची आवड होती म्हणून ते निवडले. त्यामध्ये मी सध्या चांगले काम करत आहे. आमच्या वेळी असे प्रोत्साहन मिळाले असते तर मी अन्य क्षेत्रात दिसले असते, असेही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाशिव कोंडे यांनी केले, तर धनाजी बारणे यांनी आभार मानले.

### विविध सामाजिक उपक्रमांनी ॲड. कृष्णा भांगरे यांचा वाढदिवस साजरा

**पिंपरी : दैनिक संध्या**

सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही ॲड. कृष्णा भांगरे यांनी त्यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा केला. वाढदिवसानिमित्त पांजरपोळ येथे गोमातांसाठी चारा देण्यात आला. तसेच गोमातांवर उपचार करणाऱ्या संस्थेला आर्थिक मदत देऊन सेवाभावी कार्याला हातभार लावण्यात आला. यावेळी लहान मुलांना खाऊ वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांमुळे ॲड. कृष्णा भांगरे यांच्यावर विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव झाला असून त्यांच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. या प्रसंगी गोरक्षक महेश बालघरे, बंडू अण्णा भालेकर, अक्षय साने, सूरज रोकडे, आकाश साने, निलेश शिनगारे तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थितांनी ॲड. कृष्णा भांगरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे अभिनंदन केले.

### अभिनेते व दिग्दर्शक रमेश वाकनीस यांचा मानपत्र देऊन गौरव

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड शहराच्या साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात बहुआयामी योगदान देणारे ज्येष्ठ कवी, लेखक, नाटककार, अभिनेते आणि दिग्दर्शक रमेश वाकनीस यांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तृत्वाने मोलाची भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आयोजित सभेत रमेश वाकनीस यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, राजू मिसाळ, शैलजा मोरे, अमित गावडे तसेच अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. रमेश वाकनीस यांनी कवी, लेखक, नाटककार, अभिनेते आणि दिग्दर्शक म्हणून मराठी साहित्य व रंगभूमीवर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. "पूर" आणि "आकाशा आणि काही कविता" हे त्यांचे कवितासंग्रह तर "ओळखावा धोंडा अंतरीचा" आणि "कहाणी अखेरच्या संपाची" ही त्यांची नाटके विशेष गाजली आहेत. प्राचीन पाली भाषेतील "धम्मपद" या धर्मग्रंथाचा मराठी काव्यानुवाद करून त्यांनी साहित्य आणि अध्यात्माचा सुंदर संगम घडवून आणला आहे. रंगभूमीवरील अभिनय, दिग्दर्शन आणि बालनाट्यांच्या माध्यमातून त्यांनी मराठी नाट्यपरंपरा समृद्ध करण्याबरोबरच नव्या पिढीमध्ये कलासंस्कार रुजविण्याचे कार्य केले आहे.

### प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर 'क्रीडा प्रबोधिनी' उभारण्यात यावी;

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या क्रीडा गुणवत्तेला योग्य दिशा मिळावी आणि त्यांना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर 'क्रीडा प्रबोधिनी (स्पोर्ट्स अकॅडमी)' उभारण्यात यावी, अशी मागणी भाजपच्या नगरसेविका रिटा सचिन सानप यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत केली. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या विषयावर बोलताना सानप यांनी 'खेळाडू घडवा आणि पट वाढवा' ही अभिनव संकल्पना महापालिका शाळांमध्ये राबविण्याची आवश्यकता व्यक्त केली. महापालिका आयुक्तांनी यशस्वीपणे राबविलेल्या 'गुढी पाडवा, पट वाढवा' या उपक्रमाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी विशेष योजना सुरू करण्यात यावी, असे त्यांनी सुचविले. महापालिका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्ट क्रीडा कौशल्य असूनही प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सुविधांच्या अभावामुळे त्यांना मोठ्या स्पर्धांपर्यंत पोहोचता येत नाही. विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात क्रीडा प्रबोधिनी उभारणे आवश्यक असल्याचे सानप यांनी सांगितले.

## उद्योग संधी विषयी जागरूक राहिले पाहिजे - राठी

■ पिंपरी (दै. संध्या)

विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि उद्योग विश्वातील संधी याविषयी जागरूक राहिले पाहिजे. तसेच सातत्याने कौशल्य विकास करत नव तंत्रज्ञानाशी जुळवून घ्यायला शिकले पाहिजे असे मार्गदर्शन सायबर सिक्युरिटी अँड आयटी ॲसेट मॅनेजमेंट प्रॉडक्ट स्टार्ट अप चे इंडिया हेड शरद राठी यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्यालय अंतर्गत संगणक अभियांत्रिकी विभागात एसवाय. बी.टेक. सीएसई इंडक्शन २०२६ सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, तंत्रज्ञान विद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. व्ही. पाटील, संगणक विभागाचे संचालक डॉ. अभिजित बनुबाकोडे, संगणक विभाग प्रमुख डॉ. पल्लवी अहिरे, पीसीयू संचालक आउटरीच अँड ॲडमिशन्स डॉ. रामदास बिरादार, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील शैक्षणिक प्रक्रिया, परीक्षा पद्धती, इआरपी प्रणाली, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, रेड हॅट अकॅडमी, परदेशी भाषा शिक्षणाच्या संधी, विविध विद्यार्थी क्लब्स व चॅप्टर्स, पीटीजी, आंतरराष्ट्रीय सहकार्य, इंटर्नशिप, प्लेसमेंट सहाय्य आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. निखिलेश मांकर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापन समितीचे सदस्य नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि कुलगुरू संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

## पिंपरीत कॅम्पात भरदिवसा दुकानात दरोडा; शस्त्राचा धाक दाखवून ७० हजारांची रोकड लंपास

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरीतील गजबजलेल्या बाजारपेठेत भरदिवसा घडलेल्या धाडसी दरोड्याच्या घटनेमुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे. चॉईस व्हरायटी या दुकानात तीन अज्ञात तरुणांनी घुसून धारदार शस्त्राचा धाक दाखवत गल्ल्यातील सुमारे ७० हजार रुपयांची रोकड लंपास केली. ही संपूर्ण घटना दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, तीन तरुण अचानक दुकानात आले. त्यांनी दुकानदार आणि त्यावेळी उपस्थित असलेल्या ग्राहकाला शस्त्राचा धाक दाखवत बाहेर जाण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपींनी गल्ल्यातील रोकड क्षणार्धात घेऊन घटनास्थळावरून पलायन केले.

दरोड्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आले असून त्याच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. फुटेजमध्ये आरोपींच्या हालचाली स्पष्टपणे दिसत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भरदिवसा बाजारपेठेत घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून व्यापाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## माळशेजघाट मार्गे मुंबईकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पूर्णपणे बंद..!

■ पिंपरी (दै. संध्या)

कल्याण-माळशेज घाट राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ मौजे करंजाळे गावाच्या ठिकाणी रस्ता खचल्यामुळे माळशेजघाट मार्गे अहिल्यानगर तसेच पुणे येथून मुंबईकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात आली आहे.

वाहतूक नियमन व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरिता वाहतूक बंद करण्यात आली आहे. आळेफाटा-नारायणगाव-खेड-चाकण-तळेगाव (एमआयडीसी)-लोणावळा खोपोली-मुंबई या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली असल्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आदेश जारी केले आहे.



## भोसरी-दिघी परिसर "मेट्रो कनेक्टिव्हीटी" बाबत "नो कॉम्प्रमाईज"

■ पिंपरी (दै. संध्या)

भोसरी, दिघी आणि परिसरातील सुमारे पाच लाख नागरिकांना मेट्रो सेवेपासून वंचित ठेवून कोणताही आराखडा मंजूर होणार नाही. भोसरी गावातून मेट्रो कनेक्टिव्हिटीच्या प्रश्नावर कोणत्याही प्रकारची तडजोड स्वीकारली जाणार नसून, नागरिकांच्या हक्काची मेट्रो सेवा मिळवून देण्यासाठी 'नो कॉम्प्रमाईज'ची भूमिका घेण्यात आली आहे, असा स्पष्ट इशारा भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिला.

पुणे मेट्रो टप्पा-२ अंतर्गत भक्ती शक्ती- वाकड- नाशिक फाटा- चाकण मेट्रो मार्गिकेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या (डीपीआर) सादरीकरणावेळी भोसरीतील मेट्रो कनेक्टिव्हिटीचा मुद्दा आमदार लांडगे यांनी ठामपणे उपस्थित केला. यावेळी महापौर रवि लांडगे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डिकर, महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्यासह महामेट्रो आणि महापालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आमदार लांडगे यांनी भोसरी गावातून मेट्रो मार्गिकेच्या नियोजनाबाबत भूमिका स्पष्ट करताना, "भोसरी, दिघी आणि परिसरातील लाखो नागरिकांच्या सोयीचा विचार करून मेट्रो कनेक्टिव्हिटी सुनिश्चित झालीच पाहिजे. यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड स्वीकारली जाणार नाही," असे स्पष्टपणे सांगितले. यावर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डिकर यांनी, भोसरीतील प्रस्तावित मेट्रो मार्गिकेसाठी विद्यमान उड्डाणपूल पाडण्याची वेळ येऊ शकते, असे सांगितले. पण, भोसरी, दिघी आणि परिसरातील सुमारे पाच लाख नागरिकांना त्यांच्या हक्काची मेट्रो सेवा मिळालीच पाहिजे.

## शून्य कचरा प्रकल्पातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्रीकृष्ण महिला बचत गटास 'नॅशनल प्राईड ऑफ इंडिया' पुरस्कार

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या 'शून्य कचरा (झिरो वेस्ट स्लम)' उपक्रमामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीकृष्ण महिला बचत गट यांना 'नॅशनल प्राईड ऑफ इंडिया' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार आसरा सोशल फाऊंडेशन, पुणे आणि ओम पब्लिकेशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील पत्रकार भवन येथे आयोजित 'उत्कर्ष भारत सन्मान सोहळा – २०२६' या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी बचत गटाला अभिनेते विजय गोखले व प्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बचत गटाच्या अध्यक्षा मंगल वाडकर तसेच अश्विनी चौधरी यांनी हा सन्मान स्विकारला.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने झोपडपट्टी भागांमध्ये स्वच्छता, कचऱ्याचे स्रोतावर वर्गीकरण, ओला व सुका कचरा वेगळा संकलित करणे, पुनर्वापर व पुनर्चक्रणाला चालना देणे तसेच परिसर स्वच्छ आणि कचरामुक्त ठेवण्यासाठी 'शून्य कचरा झोपडपट्टी' या प्रकल्पास १६ ऑगस्ट २०२२ रोजी सुरूवात झाली. हा प्रकल्प देशातील पहिला शून्य कचरा झोपडपट्टी प्रकल्प असून यामध्ये स्थानिक महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग घेतला जात आहे. त्यांच्यामार्फत घराघरांत जनजागृती, कचरा वर्गीकरण, संकलन आणि परिसरातील स्वच्छतेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

या प्रकल्पाची सुरुवात गवळीमाथा झोपडपट्टी परिसरात करण्यात आली होती. या ठिकाणी श्रीकृष्ण महिला बचत गटाने अत्यंत जबाबदारीने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण केली. घराघरांत जाऊन कचऱ्याचे स्रोतावर वर्गीकरण करण्यासाठी जनजागृती, नियमित कचरा संकलन, स्वच्छता राखणे आणि नागरिकांचा सहभाग वाढविणे या कामांमध्ये बचत गटाने उल्लेखनीय योगदान दिले.

## भक्ती-शक्ती, वाकड, नाशिक फाटा ते चाकण मेट्रो मार्गाला गती मिळणार

■ पिंपरी (दै. संध्या)

पुणे मेट्रो टप्पा 2 अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरासह चाकण औद्योगिक पट्ट्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या भक्ती-शक्ती–वाकड–नाशिक फाटा–चाकण मेट्रो मार्गाला गती मिळाली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून, विधिमंडळ, नगरविकास विभागाकडे या मार्गाचा प्रश्न उपस्थित करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाला तातडीने मंजुरी देण्याची आग्रही मागणी केली होती. त्याप्रमाणे सुधारित अहवाल सोमवारी सादर करण्यात आला.या सुधारित अहवालानुसार हा संपूर्ण मार्ग ४७.२१५ किलोमीटर लांबीचा, पूर्णपणे उन्नत स्वरूपाचा आणि ३४ स्थानकांचा प्रस्तावित आहे. प्रकल्पासाठी सुमारे १२ हजार ९३७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे निगडी, रावेत, पुनावळे, ताथवडे, वाकड, पिंपळे सौदागर, नाशिक फाटा, भोसरी, मोशी आणि चाकण हे निवासी, व्यावसायिक व औद्योगिक परिसर थेट मेट्रोने जोडले जाणार आहेत.

फुगेवाडी येथील महामेट्रो कार्यालयात सोमवारी, २७ जुलै २०२६ रोजी, प्रस्तावित निगडी ते चाकण मेट्रो मार्गाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसमोर सादरीकरण करण्यात आले. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी प्रस्तावित मार्गाचे संरेखन, स्थानके आणि प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेची माहिती दिली. बैठकीला पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त सौ. तृप्ती सांडभोर UMTCचे सल्लागार रजनीश पोडवळ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यांनी सांगितले, महामेट्रोने सुधारित डीपीआर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर केला होता. आता या अहवालाचे पदाधिकाऱ्यांसमोर सादरीकरण झाल्याने प्रकल्पाच्या पुढील मंजुरी प्रक्रियेला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

उपलब्ध प्रकाशित माहितीनुसार हा संपूर्ण मार्ग ४७.२१५ किलोमीटर लांबीचा, पूर्णपणे उन्नत स्वरूपाचा आणि ३४ स्थानकांचा प्रस्तावित आहे. प्रकल्पासाठी सुमारे १२ हजार ९३७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. आमदार शंकर जगताप यांनी राज्य शासन, महामेट्रो आणि महापालिका प्रशासनाकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाच्या प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळत असून, सुधारित डीपीआरच्या सादरीकरणामुळे प्रकल्पाला आवश्यक मंजुरी मिळण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे पिंपरी-चिंचवडमधील वाढते नागरीकरण, आयटी क्षेत्र, औद्योगिक आस्थापना आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन या भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने मांडली आहे. डिसेंबर २०२५ मध्ये विधिमंडळातील पुरवणी मागण्यांद्वारे त्यांनी निगडी ते चाकण व्हाया वाकड मेट्रो मार्गाच्या प्रलंबित सुधारित डीपीआरचा मुद्दा उपस्थित केला होता. डीपीआरला तातडीने मंजुरी देऊन प्रकल्प पुढे न्यावा आणि पिंपरी-चिंचवड शहराची वाहतूक व्यवस्था अधिक वेगवान व सक्षम करावी, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली होती.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा, राजे ग्रुपतर्फे मेलोडी वाटून जल्लोष

**नारायणगाव : दैनिक संध्या**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वतीने नारायणगाव येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्ते, विद्यार्थी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत फटाके फोडून तसेच मेलोडी चॉकलेटचे वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, सोनम वांगचूक यांच्या २६ दिवसांच्या उपोषणाला, CJP च्या सुमारे ४५ दिवस चाललेल्या आंदोलनाला आणि देशभरातून वाढलेल्या जनसमर्थनामुळे सरकारला अखेर हा निर्णय घ्यावा लागला, अशी त्यांची भावना आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणाऱ्या सर्व आंदोलनकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले. उपस्थितांनी शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, परीक्षा प्रक्रियेत विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त केली. भविष्यात विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि सामाजिक प्रश्नांवर राजे ग्रुप महाराष्ट्र राज्य सातत्याने जनजागृती व लोकशाही मार्गाने आंदोलन करत राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शवत एकजुटीचा संदेश दिला. यावेळी राजे ग्रुपचे अध्यक्ष जुबेर शेख, उपाध्यक्ष प्रसाद हिंगे, कार्याध्यक्ष गौतम औटी, सचिव विजय घेगडे, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, नागेश्वारी केदार, आराध्या वाव्हळ, वैभव भूमकर, जफर शेख, सकलेन आतार, अमन इनामदार, गिरीराज वाव्हळ, मनोज वर्मा, योगेश लोखंडे, पंकज भालेराव, मयूर भोईटे, मुन्ना पठाण आदी कार्यकर्ते, विद्यार्थी, व ग्रामस्थ उपस्थित होते.

### जनता विकास पॅनलने राखली सत्ता

**नारायणगाव : दैनिक संध्या**

राजुरी येथील जनता विकास मंडळाच्या ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच अत्यंत चुरशीची निवडणूक पार पडली. अनेक वर्षांची बिनविरोध निवडणुकीची परंपरा मोडीत काढत यंदा जनता विकास पॅनल आणि विद्या विकास पॅनल यांच्यात थेट सामना रंगला. या ऐतिहासिक लढतीत जनता विकास पॅनलने ११ पैकी ६ जागांवर विजय मिळवून आपली सत्ता कायम राखली आहे, तर विरोधी विद्या विकास पॅनलने ५ जागांवर बाजी मारत सत्ताधाऱ्यांना जोरदार टक्कर दिली. या निवडणुकीत मतदारांनी अत्यंत जागरूकपणे मतदान केल्याचे दिसून येत आहे. सत्ताधारी पॅनलला विजय मिळाला असला, तरी विरोधी पॅनलने तब्बल ५ जागा जिंकून त्यांच्यासमोर दमदार आव्हान उभे केले आहे. मतदारांनी केवळ एकाच बाजूने कौल न देता प्रशासनात पारदर्शकता, निर्णयप्रक्रिया आणि सर्वसमावेशक नेतृत्व या मुद्द्यांना प्राधान्य दिल्याचे या निकालावरून स्पष्ट होते. मंडळाच्या इतिहासातील या पहिल्या निवडणूक प्रक्रियेमुळे संस्थेत खऱ्या अर्थाने लोकशाहीची सुरुवात झाल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. जनता विकास पॅनलकडून बाळासाहेब सिताराम औटी, गोपाळ पुंडलिक औटी, समीर सर्वजीत औटी,डॉ. बाळकृष्ण सावळाराम घंगाळे आणि जालिंदर सोपान औटी यांनी विजय मिळवला. तर विद्या विकास पॅनलकडून ड. हेमंत यशवंत हाडवळे, संतोष महादेव डुंबरे, मंगेश कोंडीबा औटी, कैलास दत्तात्रय आवटे,गौरव बबन घंगाळे आणि राजीव विष्णू औटी यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजय संपादन केला. ७२ वर्षानंतर झालेल्या या ऐतिहासिक निवडणुकीने जनता विकास मंडळात स्पर्धात्मक लोकशाहीची नवी परंपरा सुरू झाली आहे.

### आळेफाटा बाजारात कांद्याची विक्रमी आवक; प्रतिदहा किलोला २७५ रुपयांपर्यंत बाजारभाव

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजार आवारात रविवारी झालेल्या कांदा लिलावात मोठी वाढ पाहायला मिळाली. या लिलावात तब्बल १०,९५१ गोण्या कांद्याची आवक झाली असून, एकूण ५,४७५ क्विंटल कांद्याची विक्री झाली आहे. बाजारात चांगल्या प्रतीच्या कांद्याला समाधानकारक दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. लिलावातील बाजारभावाचा तपशील- गोळा कांदा: ₹२५० ते ₹२७५ प्रति दहा किलो सुपर कांदा: ₹२३० ते ₹२५० प्रति दहा किलो गोलटी व गोल्टा कांदा: ₹२०० ते ₹२३० प्रति दहा किलो बदला/चिंगळी कांदा: ₹९० ते ₹१७० बाजार समितीचे सभापती संजय काळे आणि उपसभापती निवृत्ती काळे यांनी या बाजारभावाची अधिकृत नोंद झाल्याची माहिती दिली. बाजारात मोठ्या प्रमाणात आवक होऊनही दर्जेदार मालाला व्यापाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. दरम्यान, सध्याचा बाजारभाव पाहता कांद्याचे दर आणखी वाढण्याची आवश्यकता असल्याचे मत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे. आळेफाटा उपबाजार आवारात कांद्याचा लिलाव दर मंगळवार, शुक्रवार आणि रविवार या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होईल, अशी माहिती सचिव रुपेश कवडे आणि सतीश मस्करे शाखा व्यवस्थापक, उपबाजार आळेफाटा यांनी दिली आहे.

### माळशेज घाटातील काळू धबधब्यावर दुर्दैवी घटना; नदीच्या प्रवाहात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर–मुरबाड सीमेवरील माळशेज घाट परिसरातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ काळू धबधब्यावर शनिवारी घडलेल्या दुर्दैवी घटनेत दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. काळू नदीतील पाण्याच्या प्रवाहाचा चुकीचा अंदाज आल्याने नदी पार करण्याचा प्रयत्न दोघांच्या जीवावर बेतला. या घटनेनंतर पावसाळी पर्यटनातील सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मृतांमध्ये पवन श्याम साठे वय १८, रा. मलकापूर, जि. बुलढाणा आणि रमण विजय आण्णापुरे वय २०, रा. नांदेड यांचा समावेश आहे. पवन साठे हे कुटुंबीयांसह तर रमण आण्णापुरे हे पुण्यातील मित्रांसोबत पर्यटनासाठी आले होते. दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास पहिली आणि सुमारे ३.३० वाजता दुसरी घटना घडली. नदीतील पाणी कमी असल्याचा भास झाल्याने काही पर्यटकांनी नदी पार करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही तरुणांनी एकमेकांचे हात धरून नदी ओलांडण्याचा प्रयत्न केला; मात्र वरच्या डोंगराळ भागात झालेल्या पावसामुळे अचानक पाण्याचा प्रवाह वाढला. काही क्षणांतच दोघेही वेगवान प्रवाहात वाहून गेले. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काळू नदीचा प्रवाह अत्यंत अनिश्चित आहे. वरच्या भागात पाऊस झाल्यास नदीची पातळी अचानक वाढते. नदीपात्रातील खोल खड्डे, मोठे दगड आणि असमान पृष्ठभाग यामुळे धोका अधिक गंभीर ठरतो. याबाबतची माहिती नसल्याने अनेक पर्यटक निष्काळजीपणे पाण्यात उतरतात आणि अपघातांना बळी पडतात. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थ आणि बचाव पथकाच्या मदतीने शोधमोहीम राबवून दोन्ही तरुणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. या दुर्घटनेनंतर जुन्नर आणि मुरबाड प्रशासनाने पर्यटकांना पावसाळ्यात नदी, धबधबे आणि ओढ्यांमध्ये उतरताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच काळू धबधबा परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.





# खराबवाडी येथील अतिक्रमणांवर प्रशासनाकडून कारवाई

■ चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील खराबवाडी येथील गायरान जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणांवर महसूल प्रशासनाने मोठी कारवाई करत तब्बल ८७ व्यावसायिक अतिक्रमणे हटविली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली असून, दुसऱ्या टप्प्यात निवासी अतिक्रमणांवर ३० सप्टेंबर नंतर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

खराबवाडी येथील गायरान गट क्रमांक २/१, २/२ व ४४८ मधील सुमारे दोन एकर क्षेत्रावरील व्यावसायिक अतिक्रमणे जेसीबी व पोकलँडच्या सहाय्याने हटविण्यात आली. तळेगाव, चाकण व शिक्रापूर या राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या अतिक्रमणांवर महसूल, ग्रामपंचायत, महावितरण आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई केली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी सुमारे १५० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

गायरान जमिनीवरील अतिक्रमणा संदर्भातील न्यायालयीन प्रक्रियेनंतर सर्वोच्च न्यायालयाने अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश दिले होते. त्या आदेशानुसार महसूल प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची मोहीम खराबवाडीपासून सुरू केली आहे. नोटीस नंतर अनेकांनी स्वतःच अतिक्रमणे हटविली ग्रामपंचायतीने अतिक्रमण धारकांना जाहीर नोटीस देऊन २४ तासांच्या आत अतिक्रमणे काढून घेण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार अनेक नागरिकांनी स्वखर्चाने स्वतःची अतिक्रमणे हटविली. याबद्दल तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी संबंधित नागरिकांचे कौतुक केले.

पहिल्या टप्प्यात खराबवाडी आणि गोलेगाव येथील व्यावसायिक अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत.

पावसाळा लक्षात घेऊन निवासी अतिक्रमणांवरील कारवाई सध्या स्थगित ठेवण्यात आली असून, ३० सप्टेंबरनंतर त्यावर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधितांना लवकरच नोटिसा बजावण्यात येणार असल्याची माहिती महसूल व ग्रामपंचायत प्रशासनाने दिली.

## बालरंग भूमी परिषदेची बैठक दिमाखात संपन्न

■ चाकण (दै. संध्या)



चाकण येथे बाल रंगभूमी परिषदेची समन्वय बैठक बाल रंगभूमी परिषद मुंबईच्या अध्यक्षा तथा प्रसिद्ध अभिनेत्री नीलम शिर्के - सामंत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाली.

चाकण येथे पुणे, पिंपरी व चिंचवड शाखांच्या संयुक्त समन्वय बैठकीत नीलम शिर्के यांनी मार्गदर्शन केले. नीलम शिर्के यावेळी म्हणाल्या," बाल रंगभूमी परिषद ही महाराष्ट्रातील सर्व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन झालेली राज्यातील एकमेव संस्था आहे. रंगभूमी परिषदेच्या माध्यमातून मुलांवर होणाऱ्या कला व संस्कारांमधून उद्याच्या भारताचे उत्तम नागरिक घडतील."

या बैठकीत विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. उन्हाळी कला, संस्कार शिबिर, इतिहास महाराष्ट्राचा, लोककला महोत्सव, यहां के हम सिकंदर, दिव्यांग मुलांचा महोत्सव, बाल संमेलन, नाट्यछटा, बाल नाट्य शिक्षक शिबिर, बाल नाट्य स्पर्धा आणि सर्व सभासदांसाठी मोफत आरोग्य शिबिर आदी लोकोपयोगी विविध उपक्रमांवर चौफेर चर्चा झाली. महाराष्ट्रातील अधिकाधिक मुले, पालक आणि शाळांपर्यंत बाल रंगभूमीची चळवळ अल्पावधीत पोहोचविण्यासाठी प्रत्येक सदस्याने तत्परतेने काम करावे, असे आवाहनही नीलम शिर्के यांनी केले. याप्रसंगी राज्य कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी, हनुमंत कुबडे, पुणे अध्यक्षा दिपाली शेळके, उपाध्यक्ष अरुण पटवर्धन, नारायण करपे, प्रमुख कार्यवाह प्रकाश खोत, शंकर घोरपडे, विजयकुमार तांबे, नामदेव पडदुणे, मनोहर शेवकरी, संजय तांबे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नवीन समन्वय बैठकीत सभासदांचा सन्मान करण्यात आला. चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेवक महेश शेवकरी, निवृत्त मुख्याध्यापिका हेमलता देशमुख, मधुसूदन शेवकरी, वैभव ढोकले, तेजस्विनी तारू या नवीन सभासदांचा सन्मान करण्यात आला.

## ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मनिषा वायकर बिनविरोध

■ कोरेगावमुळ (दै. संध्या) :

सांडस ( ता. हवेली ) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मनिषा संतोष वायकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच मनिषा भाऊसाहेब कसुरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी महाले भाऊसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत मनिषा संतोष वायकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. त्यांच्या निवडीचे उपस्थित ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी तसेच ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. यावेळी सरपंच साधना (नानी) सोमनाथ भोरडे यांनी नवनिर्वाचित उपसरपंचांचे अभिनंदन करत ग्रामविकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. नवनिर्वाचित उपसरपंच मनिषा संतोष वायकर यांनी ग्रामस्थांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने काम करण्याची ग्वाही दिली.

दरम्यान, पिंपरी सांडस ग्रामपंचायतीतील उपसरपंचपदाची निवडणूक बिनविरोध पार पडल्याबद्दल गावातील सर्व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, नवनिर्वाचित उपसरपंचांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभारही व्यक्त करण्यात आले.

## हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूलमध्ये गुणवंत व लोकप्रतिनिधींचा गौरव

■ पुरंदर (दै. संध्या) :

पुरंदर तालुक्यातील हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूल, भिवडी येथे विविध स्पर्धा व व्यावसायिक परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांसह नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या लोकप्रतिनिधींचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. साहेबराव भिंताडे हे होते. तर अध्यक्षस्थानी श्रीदत्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शामकांत भिंताडे होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवड झालेल्या हरिभाऊ लोळे तसेच पंचायत समिती सदस्य म्हणून निवड झालेल्या सायलीताई शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांपैकी एल.एल.बी. पदवी प्राप्त केलेले सुमित संदीप भिंताडे, एल.एल. बी. सीईटी परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणारी आकांक्षा पोपट जैनक, पोलीस दलात नियुक्ती झाल्याबद्दल राकेश संदीप औचरे, एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेले डॉ. अविनाश अनिल क्षिरसागर तसेच अभियांत्रिकी सीईटी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारी समृद्धी भाऊ औचरे यांचाही विद्यालयाच्या वतीने गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे मा. साहेबराव भिंताडे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "माणसाच्या मनात दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर तो आयुष्यात यशस्वी होतो. दिलेला शब्द पाळणारी व्यक्तीच समाजात मोठी ठरते. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी, कष्टाला कधीही कंटाळू नये. उद्याचा भविष्यकाळ तुमचाच आहे."

## माजी कृषी व सैनिक कल्याण दादासाहेब जाधवराव यांच्या वाढदिवसानिमित्त गणवेश वाटप

■ पुरंदर (दै. संध्या)



माजी कृषी व सैनिक कल्याण राज्यमंत्री दादासाहेब जाधवराव यांच्या वाढदिवसानिमित्त गणेश अपंग विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुलाबआप्पा घिसरे यांच्या वतीने भिवरी( ता. पुरंदर )येथील श्री कानिफनाथ विद्यालयात शालेय गणवेश वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायगावचे माजी सरपंच तथा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक बारिकराव खेसे होते. प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक मनोहर कामठे उपस्थित होते.

यावेळी सरपंच मोनाली कटके, सल्लागार समिती अध्यक्ष संदीप कटके, माजी सरपंच दिलीप कटके,वीर नेताजी मंडळाचे अध्यक्ष चांगदेव घिसरे, गोसावीबुवा मंडळाचे अध्यक्ष नवनाथ भिसे, चेअरमन म्हस्कु कटके,तंटामुक्ती अध्यक्ष हनुमंत कामठे, पोलिस पाटील सचिन दळवी,बाबाजी घिसरे,अमोल कटके,सुरेखा ढवळे, बाळासाहेब फडतरे, तुकाराम कटके,बाळासाहेब नाटकर,तुकाराम कटके,शेखर कटके,बाळासाहेब कटके, रणजीत घिसरे , शंकर घिसरे, संभाजी घिसरे, पमाआण्णा कटके, मंगेश ढवळे सर्व शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव पाहायला मिळाले.

गणेश अपंग प्रतिष्ठानच्या वतीने गेली २८ वर्ष सुरू असलेल्या गणवेश वाटपामुळे विद्यार्थ्यांमध्ये समानतेची भावना निर्माण होते आणि शिस्तीला प्रोत्साहन मिळते असे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी मनोगतामध्ये सांगितले.

# नाझरे धरणात ७७ टक्के पाणीसाठा आत्ता पर्यंत २९६ मिमी पाऊस

■ जेजुरी (दै. संध्या)

दिनांक 27 सदैव दुष्काळी असणाऱ्या पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेल्या नाझरे धरणात 77 टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे. दोन महिन्यात धरणाच्या पाणलोट क्षेत्रात केवळ 296 मिमी पाऊसाची नोंद झाली आहे.

नाझरे धरणाची पाणीसाठवणूक क्षमता ही पाऊण टीएमसी असून मृतसाठा 200 दशलक्ष घनफूट आहे. पुरंदर तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान 496 मिमी असून कमी पावसामुळे तालुक्यात सतत दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असते. मागील वर्षी सरासरी पेक्षा दुप्पट पाऊस झाल्याने जुलै महिन्यात नाझरे धरण पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे जुलै अखेर पाणी टंचाई निर्माण झाली नाही. यावर्षी जून आणि जुलै महिन्या पर्यंत 296 मिलिमीटर पाऊसाची नोंद झाली आहे. अजूनही जोरदार पाऊसाची प्रतिक्षा आहे.

नाझरे धरणावर पुरंदर आणि बारामती तालुक्यातील सुमारे 40 हून अधिक गावे, तसेच जेजुरी औद्योगिक वसाहतीला पिण्याचे पाणी पुरवठा केला जातो. तर एक हजार हेक्टर क्षेत्राला हंगामी स्वरूपात पाणी दिले जाते. पाऊसाचे आणखी दोन महिने आणि माघारीचा मान्सून या कालावधीत पाऊसाची प्रतिक्षा असून धरण भरल्या नंतर पिण्याचे व शेतीला पाण्याची समस्या मिटणार आहे. सध्या समाधान कारक पाऊस पडत नसला तरी खरिपाच्या पिकांची पेरणी झाली आहे.








दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### टिटंबा आश्रमशाळा विषबाधा प्रकरणात मंत्री डॉ. उईके यांचा मोठा निर्णय

अमरावती : टिटंबा, ता. धारणी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना झालेल्या संशयित विषबाधेच्या गंभीर घटनेची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दखल घेतली. त्यांनी तातडीने धारणी आणि टिटंबा येथे भेट देऊन संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी संबंधित कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. तसेच राज्यातील आदिवासी आश्रम शाळांमध्ये सुरू असलेली सेंट्रल किचन व्यवस्था पुढील काही दिवस बंद ठेवण्याची घोषणा केली. शनिवारी टिटंबा आश्रम शाळेतील सुमारे ७० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास झाल्यानंतर त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी तातडीने धारणी येथे भेट देत उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच पालकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. यानंतर मंत्री डॉ. उईके यांनी थेट टिटंबा आश्रमशाळेत जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. विद्यार्थी, पालक, आदिवासी संघटनांचे प्रतिनिधी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत त्यांनी सविस्तर बैठक घेतली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत टिटंबा आश्रमशाळेसाठी सेंट्रल किचनमधून पुरविले जाणारे भोजन तात्काळ बंद करण्याचा निर्णयही मंत्री डॉ. उईके यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी संपूर्ण व्यवस्थेचा पुनर्विचार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### ५१७३८ लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

यवतमाळ : राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ५१,७३८ लाभार्थी शेतकऱ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. ही यादी ग्रामपंचायत, गावचावडी, सहाय्यक निबंधक / सहकार अधिकारी श्रेणी-१ तालुका ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था, बँका यांचे कार्यालयात, शेतकऱ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध असुन योजनेस सर्व पात्र शेतकऱ्यांनी त्यांचे नाव यादीमध्ये असल्याची खात्री करुन नावासमोरील विशिष्ठ क्रमांक, बँकेचे पासबुक, आधार कार्ड, आधार कार्डशी संलग्न मोबाईल यासह जवळचे सेतु सुविधा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणिकरण करावे. कर्जमुक्ती योजनेस पात्र असणाऱ्या ज्या शेतकऱ्यांची अॅग्रीस्टॅक पोर्टलवर अद्यापही नोंदणी झालेली नाही, अशा शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती योजनेचे आधार प्रमाणिकरण सुलभतेने होण्यासाठी प्रथम अॅग्रीस्टॅक पोर्टलवर तात्काळ नोंदणी करुन घ्यावी. व त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चे आधार प्रमाणिकरण करावे. यादीमध्ये नाव आलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी सेतु सुविधा केंद्रावर आधार प्रमाणिकरण करण्यापुर्वी आपले नाव, बँक कर्ज खाते क्रमांक, कर्ज रक्कम याबाबत शहानिशा करुन आधार प्रमाणिकरण करावे व सुलभरित्या कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा.

### महाआरोग्य शिबिर एक वरदान

नागपूर : आरोग्यम धनसंपदा, असे सुभाषित असले, तरी प्रत्यक्षात आरोग्याकडे दुर्लक्ष हा बहुतांश जणांचा स्थायीभाव असतो. अनेकजण 'काय होते', म्हणून आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत, तर पैशांअभावी योग्य उपचार मिळू न शकणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले 'महाआरोग्य शिबिर' हे रुग्णांसाठी एक वरदान ठरले आहे. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर ज्या क्षेत्रांमध्ये त्यांनी विशेष लक्ष देण्याचा संकल्प केला, त्यात आरोग्य क्षेत्र एक प्रमुख आहे. गरिबातल्या गरीब माणसाला आरोग्य सुविधा कशा सहज मिळू शकतील, याद्दष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊ लागले आहे. त्यासाठी त्यांनी रुग्णालयांची संख्या वाढविली आणि अस्तित्वात असलेली रुग्णालये अत्याधुनिक केली.

# नैना क्षेत्रातील नगर रचना योजनांमधील त्रुटी दूर करून ग्रामस्थांना मालमत्ता पत्रक वाटप करावे

■ मुंबई (दै. संध्या)



नवी मुंबईतील नैना (नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्ल्यूएन्स नोटीफाईड एरिया) क्षेत्रातील गावांच्या नगर रचना योजनांना तातडीने मंजुरी द्यावी. तसेच मंजूर असलेल्या योजनांमधील त्रुटी दूर करून ग्रामस्थांना मालमत्ता कार्डांचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सिडको-नैना अंतर्गत गावांच्या प्रश्नांसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, विक्रांत पाटील यांच्यासह सिडकोचे व्यस्थापकीय संचालक अश्विन मुदगल, सह व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल आदि उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून नैना क्षेत्रातील नगर रचना योजना प्रलंबित आहेत. मंजूर केलेल्या योजनांमध्ये त्रुटी असल्याचे नागरिक व लोकप्रतिनिधींचे म्हणणे आहे. यासंदर्भात प्रत्यक्ष स्थळावर जाऊन सर्वेक्षण करून त्रुटी दूर कराव्यात. तसेच जमीन मोजणीसाठी आता शासनाने खासगी यंत्रणांना मंजुरी दिली आहे. त्यांच्या मार्फत या क्षेत्रातील जमिनींची मोजणी करावी. नैना क्षेत्रातील तसेच विविध महानगर प्राधिकरणाच्या क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा, वाहतूक, पार्किंग, रस्ते, विकास आराखडा आणि पायाभूत सुविधांचा एकत्रित विचार करून नियोजन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही लवकरात लवकर नैना क्षेत्रातील नगर रचना योजनांना मंजुरी देण्याची सूचना केली. आवश्यक असल्यास मनुष्यबळ वाढवावे. गावकऱ्यांना पात्रतेनुसार जमिनीचे वाटप करून पारदर्शकता ठेवावी. तसेच नैना क्षेत्रात भविष्यात मोठ्या प्रमाणावर शहरे आणि प्रकल्प उभे राहणार असतील, तर त्यासाठी पाणीपुरवठ्याचे नियोजन आधीच करणे आवश्यक आहे. कोंढाणे, केटवणे, बाळगंगा आदी जलस्रोतांचा विचार करून दीर्घकालीन पाणीपुरवठा आराखडा तयार करण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र पर्यटनाचे प्रभावी ब्रँडिंग करा

■ मुंबई (दै. संध्या)



महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची ओळख केवळ राज्य आणि देशापुरती मर्यादित न राहता ती आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचावी, यासाठी आधुनिक मार्केटिंग, डिजिटल ब्रँडिंग आणि प्रभावी प्रचारावर भर देण्याच्या सूचना पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या.

महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या २०२५-२६ मधील मार्केटिंग व ब्रँडिंग कामकाजाचा आढावा तसेच २०२६-२७ च्या कृती आराखड्याबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, उपसचिव संतोष रोकडे, उपसचिव विजय पोवार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, सहसंचालक संतोष जाधव, सहाय्यक संचालक रवींद्र पवार, सहाय्यक संचालक सुशील पवार, कार्यकारी अभियंता आकाश चकोर यांच्यासह इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या मार्केटिंग व ब्रँडिंग उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच आगामी २०२६-२७ मधील प्रचार, प्रसार, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर, नाविन्यपूर्ण विपणन संकल्पना आणि पर्यटन क्षेत्राच्या व्यापक प्रसिद्धीसाठी आखण्यात येणाऱ्या कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याचबरोबर महाराष्ट्राची समृद्ध पारंपरिक खाद्यसंस्कृती, लोकपरंपरा, कला आणि सांस्कृतिक वैभव यांचा प्रभावी प्रचार करून राज्याची वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन ओळख देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्याच्या सूचना पर्यटन मंत्री देसाई यांनी दिल्या.

महाराष्ट्राला जागतिक पर्यटन नकाशावर अधिक ठळक स्थान मिळवून देण्यासाठी पर्यटन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्य करून प्रभावी अंमलबजावणी करावी.

## सुविधांची पडताळणी होईपर्यंत फ्लॅटसची नोंदणी स्थगित

■ नागपूर (दै. संध्या)

वाढत्या महानगराच्या विस्तारात ज्या निकषावर उंच इमारतींना व फ्लॅटस योजनांना परवानगी दिली त्याची पूर्तता संबंधितांनी केली किंवा नाही याची पडताळणी झाली पाहिजे. ही पडताळणी जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कोणत्याही फ्लॅटसची पुढील आदेशापर्यंत नोंदणी करू नका, असे सक्त आदेश महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत महानगरातील विकास योजनांना चालना देण्यासाठी जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री. अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, प्रा. संजय भेंडे, डॉ. राजीव पोतदार, डॉ. नितीन राऊत, मोहन मते, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, विकास ठाकरे, मनपाच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरुगानंथम एम यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उंच इमारती, अपार्टमेंटस यांची संबंधितांना ऑक्युपन्सी सर्टिफिकेट अर्थात भोगवटा प्रमाणपत्र देताना सुरक्षिततेसह पायाभूत सुविधेच्या दृष्टीने अनेक बाबींचा यात अंतर्भाव असतो. अनेक प्रश्न निर्माण झाले असून याबाबत आ. प्रवीण दटके, आ. डॉ. नितीन राऊत, आ. विकास ठाकरे, अॅड. अभिजित वंजारी, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी व इतर मान्यवर सदस्यांनी बैठकीत प्रश्न उपस्थित करून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे लक्ष वेधले.

## राज्यातील विविध जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई वेधशाळेने राज्यातील पुढील पाच दिवसांच्या हवामानाचा अंदाज जाहीर केला असून, अनेक जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी हवामानाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

अलर्ट नुसार २७ जुलै २०२६ रोजी रायगड, रत्नागिरी , सातारा जिल्ह्यातील घाट परिसर , आणि पुणे जिल्ह्यातील घाट परिसरात ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, नांदेड, हिंगोली, लातूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, कोल्हापूर घाट परिसर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला असून वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. २८ जुलै २०२६ रोजी चंद्रपूर, गडचिरोली, रायगड, जळगाव, पुणे घाट परिसर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. २९ जुलै २०२६ रोजी गोंदिया चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर नाशिक, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, कोल्हापूर घाट, रत्नागिरी, सातारा घाट, रायगड, पुणे घाट आणि सिंधुदुर्ग या भागात वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कांदळवनाचे संरक्षण करणाऱ्यांसाठी बक्षीस योजना राबविणार

■ मुंबई (दै. संध्या)

कांदळवनांवरील अतिक्रमण, बांधकामे आणि मलबा टाकण्याच्या प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येईल. कांदळवनांचे संरक्षण करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षीस योजना राबविण्याचा विचार असून, निसर्गाचा ऱ्हास करणाऱ्यांमध्ये कायद्याची भीती निर्माण होईल अशी कठोर शिक्षा व्हावी, असे प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी केले.

आंतरराष्ट्रीय कांदळवन परिसंस्था संवर्धन दिनानिमित्त आयोजित 'कांदळवन प्रतिष्ठान पुरस्कार वितरण सोहळा – २०२६' मध्ये ते बोलत होते. वाय. बी. चव्हाण सेंटर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, कांदळवन प्रतिष्ठानचे कार्यकारी संचालक तथा मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण तसेच वन विभागाचे अधिकारी व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, राज्यातील कांदळवनांचे संरक्षण ही काळाची गरज आहे. समुद्रकिनारी आढळणारे पक्षी, मासे, कासव आणि इतर सागरी जैवविविधतेचे संवर्धन करण्याची जबाबदारी वन विभागावर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड माँ के नाम' अभियानाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या ३०० कोटी वृक्षलागवडीच्या आवाहनाला प्रतिसाद देत वन विभाग हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. मुंबईतील कांदळवन परिसरात मोठ्या प्रमाणावर मलबा टाकणे व अनधिकृत बांधकामे होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत चेन्नई विद्यापीठाच्या सहकार्याने २००५ पासूनच्या उपग्रह आणि गुगल प्रतिमांच्या आधारे अतिक्रमणांची पडताळणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. संबंधित अधिकाऱ्यांना ही माहिती पाठवून प्रभावी कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव वन मिलिंद म्हैसकर यांनी सांगितले की, राज्यातील कांदळवन क्षेत्र २२२ चौरस किलोमीटरवरून ३१५ चौरस किलोमीटर (३१ हजार ५०० हेक्टर) इतके वाढले आहे. देशातील सुमारे ९५ टक्के कांदळवन पश्चिम बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, ओडिशा आणि अंदमान-निकोबार या राज्ये व केंद्रशासित प्रदेशात आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि वसई-विरारसारख्या दाट लोकवस्तीच्या भागात कांदळवन असल्याने त्यांचे संरक्षण हे मोठे आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले. कांदळवन कार्बन साठा वाढविण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात तसेच लोकसहभाग आणि स्थानिकांच्या उपजीविकेलाही त्यातून बळ मिळते.

## विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत १७ ऑगस्टला प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असून, सध्याच्या मतदार यादीतील सर्व मतदारांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत गणना अर्ज भरून त्यावर स्वाक्षरी करून गृहभेटीस येणाऱ्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने केले आहे. वेळेत गणना अर्ज भरून सादर करणाऱ्या मतदारांची नावे १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहेत.

प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना तसेच नवमतदारांना १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नमुना क्रमांक ६ (आवश्यक घोषणापत्र व कागदपत्रांसह) भरून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. संबंधित मतदार नोंदणी अधिकारी अर्जांची पडताळणी करून पात्र मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करतील. दावे व हरकतीच्या या कालावधीत मतदारांना नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना ६, नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना ८ भरता येणार आहे. तसेच संबंधित मतदारसंघातील कोणताही मतदार मतदार यादीतील कोणतीही नोंद वगळण्यासाठी नमुना ७ भरून हरकत नोंदवू शकतो.

मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज करताना चुकीची घोषणा अथवा खोटी माहिती दिल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ नुसार संबंधित व्यक्तीस एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.




मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा नाव वगळण्यासाठी अर्ज करताना चुकीची घोषणा अथवा खोटी माहिती दिल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ नुसार संबंधित व्यक्तीस एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम २२ व २३ नुसार अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही पात्र नागरिकांना नाव समाविष्ट करणे किंवा नोंदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी विहित नमुना क्रमांक ६ द्वारे अर्ज करता येणार आहे. मतदार यादीचे अद्ययावतीकरण ही निरंतर प्रक्रिया असून, कोणत्याही निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत अशा सुधारणा करता येतात, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## आमदार सत्यजीत तांबे यांनी शिक्षण व्यवस्थेचा घेतला प्रत्यक्ष आढावा

**नाशिक : दैनिक संध्या**

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सातत्याने विधिमंडळात मांडत शिक्षक, विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार सत्यजीत तांबे यांनी आज नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी डी.पी. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बोरगाव येथे सदिच्छा भेट देत शिक्षण व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी त्यांनी सविस्तर संवाद साधला. शाळा व महाविद्यालयासमोरील विविध प्रशासकीय, शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्न, विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच संस्थेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संवादादरम्यान शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न आणि मागण्या आमदार तांबे यांच्यासमोर मांडल्या. या सर्व मागण्यांवर शासनाच्या संबंधित स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही आमदार सत्यजीत तांबे यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण, आधुनिक आणि संधीसमृद्ध शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपण कायम कटिबद्ध असल्याचा विश्वासही आमदार तांबे यांनी व्यक्त केला.

■ शिक्षकांच्या प्रश्नांवर पाठपुराव्याची ग्वाही

संस्थेच्या विकासासह विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींवर सविस्तर चर्चा

## लोणी भापकर येथे कोयत्याने जीवघेणा हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**बारामती : दैनिक संध्या**

वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोणी भापकर (बोरघाट) येथे झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व शस्त्रास्त्र कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील पीडित प्रथमेश उर्फ सोन्या जालींदर कांबळे (वय 28, व्यवसाय – शेती, रा. लोणी भापकर, ता. बारामती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक 27 एप्रिल 2026 रोजी दुपारी सुमारे 12.15 वाजण्याच्या सुमारास लोणी भापकर बोरघाट येथील सोन्या आरडे यांच्या पोल्ट्री फार्मवर आरोपींनी जीव घेण्याच्या उद्देशाने लोखंडी कोयत्याने त्यांच्या मान व डोक्यावर वार करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी अभिषेक तात्या पवार, प्रथमेश जालींदर खोमणे, महेश भापकर आणि ओंकार उर्फ सोनू राजेश आरडे (सर्व रा. लोणी भापकर, ता. बारामती) यांच्याविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 149/2026 अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम 109, 61(2), 352, 351(2), 3(5), अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यातील कलमे 3(2)(V), 3(2)(VA), 6 तसेच शस्त्रास्त्र कायद्यातील कलम 4 व 25 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद 27 जुलै 2026 रोजी सायंकाळी 6.14 वाजता करण्यात आली असून, पोलीस हवालदार खेडकर यांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी कदम करीत आहेत. घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांनीही भेट देऊन पाहणी केली.

## पुण्यात एफडीएची मोठी धाड; ५५ लाखांचा निकृष्ट अन्नसाठा जप्त

**पुणे : दैनिक संध्या**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे शहराच्या मध्यवस्तीतील विविध भागांत धडक तपासणी मोहीम राबवत निकृष्ट, असुरक्षित तसेच विनापरवाना साठवून ठेवलेल्या अन्नपदार्थांवर मोठी कारवाई केली. गणेश पेठ, भवानी पेठ आणि नाना पेठ परिसरातील विविध व्यावसायिक आस्थापनांवर छापे टाकून मिठाई, कँडी, चॉकलेट, सुकामेवा आणि इतर अन्नपदार्थांचा सुमारे ५५ लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. एफडीएच्या पथकाने गणेश पेठेतील दोन ठिकाणी कारवाई केली. येथील 'वर्धमान एंटरप्रायझेस'मध्ये तपासणी केली असता ८१३ किलो अन्ना मलई मिठाई, एक हजार २९६ किलो इमली जेली आणि ८१२ किलो लव्हली कँडी असा एकूण १७ लाख ८२ हजार ९३२ रुपये किमतीचा साठा आढळून आला. संबंधित अन्नपदार्थ निकृष्ट व असुरक्षित असल्याच्या तसेच त्यांच्याकडून लेबलिंग नियमांचे उल्लंघन झाल्याच्या संशयावरून हा संपूर्ण साठा जप्त करण्यात आला. गणेश पेठेतीलच 'न्यू पांडियन एंटरप्रायझेस' येथेही एफडीएच्या पथकाने तपासणी केली. या ठिकाणाहून सोनपापडी, चिक्की आणि रसमलाई बर्फी असा सुमारे ५८ हजार ६२० रुपये किमतीचा माल ताब्यात घेण्यात आला. संबंधित अन्नपदार्थ असुरक्षित असल्याचा संशय प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, भवानी पेठेतील गुरुनानक हायस्कूलजवळ असलेल्या माणिक सोहनलाल परमार यांच्या गोदामावर छापा टाकल्यानंतर मोठ्या प्रमाणात विनापरवाना अन्नपदार्थांची साठवण केल्याचे उघडकीस आले.

# आयुष्मान भारत कार्ड मोहिमस्तरावर उपलब्ध करुन द्यावे : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य विभागाच्या विविध विषयांचा आढावा

■ पुणे (दै. संध्या)

प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याच्याकरिता आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने ग्राम विकास, महसूल व आरोग्य विभागाने मोहिम स्वरुपात कार्यवाही करावी, केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य विषयक योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी; आरोग्य सुविधेपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आरोग्य विभागाच्या विविध विषयांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, समन्वयक उपस्थित होते. श्री. डुडी म्हणाले, आयुष्मान भारत कार्डद्वारे पात्र कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळतात. याबाबतची माहिती सर्व



नागरिकांपर्यंत पोहचावी व या संधीचा लाभ नागरिकांना व्हावे यादृष्टीने राज्य व केंद्र शासन प्रयत्नशील आहे. याकरिता कार्डच्या अनुषंगाने नागरिकांची नोंदणी, वितरण करण्याची कार्यवाही करावी. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या निकषाप्रमाणे रुग्णालये संल्गन करण्याची कार्यवाही करावी. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणीकरिता रुग्ण कल्याण समितीला सोबत घेवून काम करावे. आरोग्य योजनांची माहिती घरोघरी पोहोचविण्याकरिता आशा कार्यकर्त्या महत्वाची भुमिका बजावतात, त्यांना वेळेत भत्ते देण्यात यावे. जिल्ह्याला दिलेल्या निकषाप्रमाणे ग्रामीण भागातील गरोदर महिलांची प्रसुती शासकीय आरोग्य केंद्रामध्ये होईल, त्यादृष्टीने त्यांना आवश्यक त्या सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. पात्र बालकांचे तसेच पात्र मुलींचे 100 टक्के एचपीव्हीसी लसीकरण करावे. राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे क्षयरोगमुक्त ग्राम करण्यावर भर दिला पाहिजे.

पावसाळ्यात नागरिकांना शुद्ध पाणी मिळाले पाहिजे. कुष्ठरोग, काविळ, क्षयरोग, मलेरिया, सिकलसेल आदी आजारांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्यात यावा. याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध कार्यवाही करावी. ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा बळकटीकरणाकरिता निधीची कमतरता पडू देणार नाही, अशा सूचना श्री. डुडी यांनी दिल्या.

## शिबीराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा : उत्तम दिघे



■ बारामती (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे २ ऑगस्ट रोजी शरदचंद्र पवार कॉलेज इंजीनियरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी सोमेश्वर नगर येथे आयोजन करावे, या शिबारात अधिकाधिक नागरिकांना लाभ देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिले. या शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होवून लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी सचिन यादव, तहसीलदार स्वप्नील रावडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्री. दिघे म्हणाले, महसूल विभागाअंतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबधित दैनंदिनी प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी निकाली काढून महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्यादृष्टीने शिबीर अत्यंत महत्वाचे आहे.

यामध्ये महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र तसेच गावठाणातील नागरिकांना स्वामित्व देण्याबाबत सनद वाटप करणे, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे, तुकडेबंदी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक क्षेत्र घोषणा, जिवंत सातबारा मोहिम, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यासाठी विशेष तरतुद, कुंभार समाजातील व्यक्तींना पारंपारिक व्यवसायासाठी सवलती, शेतजमीनीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क पुर्णपणे माफ तसेच ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले, शिधापत्रिका वाटप करणे.

## कजारिया कंपनीचे टाईल्स, बाथवेअर व ॲडहेसिव्ह एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीची टाईल्स उत्पादक कंपनी कजारिया सिरेमिक्स लिमिटेड यांनी पुण्यातील शिवाजीनगर येथे अत्याधुनिक कजारिया आणि केरोविट एक्सपीरियन्स सेंटर सुरू केले आहे. देशातील सर्वात मोठ्या अशा या केंद्राचे उद्घाटन कजारिया सिरेमिक्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक ऋषी कजारिया यांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजीनगर येथील डीएसके गंधर्व हाइट्स, कृषी महाविद्यालयाजवळ असलेल्या या १५,००० चौरस फूट क्षेत्रफळाच्या केंद्रात ग्राहक, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझायनर आणि बांधकाम व्यावसायिकांना टाईल्स, बाथवेअर आणि ॲडहेसिव्ह उत्पादनांची विस्तृत श्रेणी एकाच छताखाली पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



हे केंद्र तीन मजल्यांवर पसरले असून येथे कजारिया टाईल्स, युनीटेरा व अल्टिमा या मोठ्या आकाराच्या स्लॅब्स, केरोविट बाथवेअर तसेच ग्रेसबॉण्ड ॲडहेसिव्ह उत्पादने प्रदर्शित करण्यात आली आहेत. यावेळी बोलताना ऋषी कजारिया म्हणाले, "भारतातील प्रत्येक कुटुंबाला उत्कृष्ट टाईल्स व बाथ सोल्युशन्स उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. पुण्यातील हे नवीन एक्सपीरियन्स सेंटर ग्राहकांना जागतिक दर्जाच्या उत्पादनांचा आणि संपूर्ण जीवनशैली समाधानांचा अनुभव देईल." तसेच कार्तिक कजारिया, बिझनेस हेड – ग्रेसबॉण्ड यांनी सांगितले की, आजच्या बांधकाम क्षेत्रात विशेषतः मोठ्या आकाराच्या टाईल्ससाठी दर्जेदार ॲडहेसिव्हचे महत्त्व वाढले आहे. ग्रेसबॉण्डकडे विविध प्रकारचे टाईल ॲडहेसिव्ह, ग्राउट्स आणि टाईल क्लिनर्सची संपूर्ण श्रेणी उपलब्ध आहे.

गेल्या ३८ वर्षांहून अधिक काळापासून कजारिया ही भारतातील अग्रगण्य टाईल्स ब्रँड असून कंपनीची वार्षिक उत्पादन क्षमता ९०.५० दशलक्ष चौरस मीटर इतकी आहे. गुणवत्ता, नावीन्य आणि अत्याधुनिक उत्पादन प्रक्रियेमुळे कजारियाने उद्योग क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. २०१४ मध्ये सुरू झालेल्या केरोविट ब्रँडअंतर्गत आधुनिक सॅनिटरीवेअर व बाथ सोल्युशन्सची निर्मिती केली जाते. राजस्थानमधील गैलपूर आणि गुजरातमधील मोरबी येथील अत्याधुनिक उत्पादन केंद्रांमधून जागतिक दर्जाची उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवली जातात.

## मेट्रो पहिल्या टप्प्यासाठी सज्ज

■ पुणे (दै. संध्या)

हिंजवडी - शिवाजीनगर मार्गावर पहिल्या टप्प्यातील मेट्रो मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (पीआयसीटीएमआरएल) यांनी राज्य सरकारला कळविली आहे. आता या मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे उदघाटन राज्य सरकार केव्हा करणार, याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. हिंजवडी - शिवाजीनगर दरम्यान वारंवार वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे या मार्गावर मेट्रो सुरू कधी होणार, या बद्दल प्रवाशांमध्ये उत्सुकता आहे. ही मेट्रो सुरू करण्याबाबत 'पीएमआरडीए'ने या पूर्वी तीन वेळा केलेले दावे फोल ठरले आहे.

## कृषी विज्ञान केंद्र बारामती येथे शास्त्रीय सल्लागार समितीची सभा संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

मंगळवार दिनांक 28 जुलै 2026 रोजी ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र बारामती येथे शास्त्रीय सल्लागार समितीची सभा संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त मा.श्री.विष्णुपंत हिंगणे उपस्थित होते. दूरदर्शी प्रणालीमार्फत आयसीएआर अटारी पुणेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.सय्यद शाकीर अली,महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार संचालक डॉ.ससाणे,डॉ.मृणाल अजोतीकर,कांदा व लसूण संशोधन केंद्राचे डॉ.राजीव काळे,पुरंदर येथील अंजीर व सीताफळ संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.युवराज बालगुडे उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय अजैविक तान संशोधन केंद्र माळेगावचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.संग्राम चव्हाण, विभागीय विस्तार केंद्राचे प्रमुख डॉ.सोमनाथ माने व डॉ.भालेराव, मंडल



कृषी अधिकारी श्री.डोंबाळे, आत्मा तालुका तंत्रज्ञ व्यवस्थापक श्री.विश्वजीत मगर प्रत्यक्ष उपस्थित होते.यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या योजनांचा लाभ घेतलेले शेतकरी,उद्योजक श्री.विश्वजीत वाबळे,केंद्रप्रमुख डॉ.धीरज शिंदे व इतर सर्व कृषी विज्ञान केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.संतोष गोडसे यांनी प्रस्तावना करून उपस्थितांचे स्वागत केले केंद्रप्रमुख डॉ.धीरज शिंदे यांनी गेल्या वर्षीचे सूचना व त्यावर केलेले पूर्तता तसेच केंद्रामधील नवीन सुरू केलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले.

## जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत प्रॉँडिजी पब्लिक स्कूलने व्दितीय क्रमांक पटकावून घवघवीत यश प्राप्त केले.

■ वाघोली (दै. संध्या)

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रॉँडिजी पब्लिक स्कूलने 2026-27च्या जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय पुणे, आयोजित सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल कप येथील स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत व्दितीय क्रमांक पटकावला स्पर्धेत एकूण 90 संघ सहभागी झाले होते. प्रत्येक सामन्यात प्रॉँडिजीच्या खेळाडूनी सांघिकखेळ, शिस्त, आणि जिद्दीच्या जोरावर अंतिम फेरीत स्थान निर्माण केले. अंतिम सामान्यात संघाने अतिशय कडवी झुंज दिली खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे शाळेच्या नावाची जिल्हा स्तरात गौरवाने नोंद करण्यात आली.या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक माजी आरोग्य मंत्री आमदार डॉ. तानाजी सावंत, संस्थेचे उपअध्यक्ष गिरिराज सावंत, संस्थेचे विश्वस्त ऋषिराज



सावंत व वाघोली संकुल प्रमुख डॉ. वसंत बुगडे, संकुल सहायक शंकर वाघचौरे तसेच शैक्षणिक सहायक संचालिका डॉ. अँग्रिस् मॅंडम प्राचार्या हर्षा मटेटी मॅंडम शाळेच्या उपप्राचार्या दीपाली काटे मॅंडम सर्व विभागाच्या समन्वयक मॅंडम यांनी क्रीडा प्रशिक्षक धनंजय जाधव सर क्रीडा सहाय्यक प्रशिक्षक विजय घुले सर तसेच सर्व विजयी खेळाडू संग्राम शिंदे (कर्णधार)सुरेंद्र थयात (उप कर्णधार), अजय चौधरी, पृथ्वी पाटील, सार्थक बिराजदार, हर्षवर्धन जिरेसाल, विश्वेश माळी, विराज गायकवाड, कौस्तुभ दीक्षित, पार्थ मोरे, सोहम मापारी, आदित्य शिर्के, अनिरुद्ध भालेराव, अभिषेक चौधरी, प्रतीक पिल्ले, आर्यन पवार यांचे अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# लग्नाचे आमिष दाखवून महिला वकिलाची फसवणूक

### लैंगिक शोषण व आर्थिक गैरफायदा; पोलीस हवालदाराविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल

पीडित महिलेची ओळख कायदेशीर कारणास्तव गोपनीय ठेवण्यात आली असून या प्रसिद्धीपत्रकात तिचा उल्लेख "निर्भया" या काल्पनिक नावाने करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील सर्व आरोप हे फिर्यादीच्या तक्रारीवर आधारित असून त्यांची सत्यता तपासातून निश्चित केली जाईल.

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे एका महिलेने (ओळख गोपनीय ठेवण्यासाठी काल्पनिक नाव "निर्भया") दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस खात्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस हवालदाराविरुद्ध लग्नाचे खोटे आश्वासन देऊन विश्वास संपादन करणे, दीर्घकाळ सहजीवन ठेवून लैंगिक शोषण करणे, आर्थिक फसवणूक करणे, धमक्या देणे व मुलीचा स्वीकार करण्यास नकार देणे अशा गंभीर स्वरूपाच्या आरोपांप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी रमेश मोहन जाधव, व्यवसाय पोलीस हवालदार (बकल क्र. ५६१), नियुक्ती खडकी, पुणे, मूळ रा. निंभोरे, ता. करमाळा, जि. सोलापूर, सध्या रा. कुर्डुवाडी याच्याविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २९७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६९, ८१, ३५१(२), ३५१(३) व ३१८ अन्वये दिनांक २७ जुलै २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी महिला व्यवसायाने वकील असून सन २०२४ मध्ये न्यायालयीन कामकाजाच्या निमित्ताने आरोपीचा तिच्याशी संपर्क आला. सुरुवातीला न्यायालयीन प्रकरणाच्या कारणाने संवाद सुरू झाल्यानंतर आरोपीने सातत्याने मोबाईलवर संपर्क ठेवत, फोन, संदेश व वैयक्तिक संवादाच्या माध्यमातून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर स्वतःचे पहिले वैवाहिक जीवन संपुष्टात आले असून पत्नीपासून अनेक वर्षे विभक्त राहत असल्याचे सांगून फिर्यादीशीच कायदेशीर विवाह करणार असल्याचे वारंवार आश्वासन दिले. "तूच माझी होणारी पत्नी आहेस", "आयुष्यभर तुझी साथ सोडणार नाही", "आपण कायदेशीर विवाह करू" अशी भावनिक आश्वासने देत आरोपीने तिचा पूर्ण विश्वास संपादन केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

त्यानंतर दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी आरोपी बारामती येथे आला. आर्थिक अडचण असल्याचे कारण सांगून त्याने फिर्यादीकडून ₹४०,०००/- रोख रक्कम घेतली. त्याच दिवशी आरोपीने फिर्यादीला बारामती येथील एका लॉजमध्ये नेले. तेथे पुन्हा विवाहाचे आश्वासन देऊन तिची फसवणूक करत प्रथमच शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप फिर्यादीने केला



आहे. या घटनेनंतर आरोपीने आपल्या नातेवाईकांसह फिर्यादीच्या घरी जाऊन विवाहाबाबत चर्चा केली. त्यामुळे आरोपीचे आश्वासन खरे असल्याचा फिर्यादीचा विश्वास अधिक दृढ झाला. काही दिवसांनी आरोपीने एका मंदिरात फिर्यादीच्या गळ्यात स्वतःच्या गळ्यातील साखळी मंगळसूत्र म्हणून घालून "आता तू माझी कायदेशीर पत्नी आहेस" असे सांगितले. त्यानंतर जेऊर व निंभोरे परिसरात फिर्यादीला पत्नी म्हणूनच परिचय करून देत काही काळ तिच्यासोबत सहजीवन केले, अशी फिर्यादीची तक्रार आहे.

सहजीवनादरम्यान फिर्यादी गर्भवती राहिली. गर्भधारणेनंतर आरोपीचे वर्तन बदलले. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपीने तिची कोणतीही शारीरिक, मानसिक अथवा आर्थिक जबाबदारी स्वीकारली नाही. उलट संशय घेऊन वाद घालणे, मानसिक त्रास देणे, आवश्यक उपचारासाठी मदत न करणे तसेच गर्भधारणेदरम्यान तिला एकटीला सोडून देणे अशा प्रकारे वागणूक दिली.

दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादीला कन्यारत्न प्राप्त झाले. सदर मुलगी आरोपीपासून झालेली असून तोच तिचा जैविक पिता असल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. मात्र मुलीच्या जन्मानंतरही आरोपीने मुलीला स्वीकारण्यास नकार दिला. तिची भेट घेतली नाही, संगोपनासाठी कोणतीही आर्थिक मदत केली नाही तसेच फिर्यादीशी अपमानास्पद व अश्लील भाषेत संवाद साधत तिला वारंवार मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपीने विविध वेळा तिच्याकडून तसेच तिच्या नातेवाईकांकडून रोख व ऑनलाईन स्वरूपात आर्थिक व्यवहार केले. त्यातील मोठा हिस्सा अद्याप परत करण्यात आलेला नसून आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय आरोपीने वेळोवेळी "तक्रार मागे घे", "तडजोड करू", "गुन्हा दाखल करू नकोस" अशा प्रकारे दबाव टाकला. तसेच अश्लील व अपमानास्पद भाषा वापरत धमक्या दिल्याचाही फिर्यादीचा आरोप आहे. या प्रकरणात तपासादरम्यान मोबाईल कॉल रेकॉर्डिंग, कॉल डिटेल रेकॉर्ड, व्हॉट्सॲप चॅट, संदेश, छायाचित्रे, व्हिडिओ, बारामती येथील लॉजची नोंदवही, सीसीटीव्ही फुटेज, मंदिरातील सीसीटीव्ही, जेऊर व निंभोरे येथील साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय उपचार व प्रसूतीचे अभिलेख, आर्थिक व्यवहारांचे बँक रेकॉर्ड तसेच इतर डिजिटल व दस्तऐवजीय पुरावे जप्त करून त्यांची सखोल पडताळणी करण्यात येणार आहे. सदर गुन्ह्याचा तपास बारामती शहर पोलीस स्टेशनमार्फत सुरू असून सर्व तांत्रिक, डिजिटल, वैज्ञानिक व दस्तऐवजीय पुराव्यांच्या आधारे निष्पक्ष व सखोल तपास करण्यात येत आहे. या प्रकरणाबाबत कोणाकडेही उपयुक्त माहिती किंवा पुरावे असल्यास त्यांनी बारामती शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधून तपासात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.